म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
क्र. 2092
१९६५

# अमरगीत



REFBK-0014804
REFBK-0014804

अमर शेख

# अमर गीत

( गीतें, लावण्या, पोवाडे )

३१०३१
७५०२४
१६।३।५९

शाहीर

अमर शेख

98008
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०
REFBK-0014804

अभिनव प्रकाशन, मुंबई १२.

किंमत दीड रुपया

प्रकाशक :

वामन विष्णु भट
**अभिनव प्रकाशन**
७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड,
परळ, मुंबई १२.

*प्रथमावृत्ति : मार्च १९५१*

*द्वितीयावृत्ति : मार्च १९५९*

*तृतीयावृत्ति : मार्च १९६५*

सर्व हक्क :

सौ. ज्योति अमर शेख
जेकब सर्कल, मुंबई ११.
यांचे स्वाधीन.

मुद्रक :

वासुदेव विष्णु भट
**साहित्य सहकार मुद्रणालय**
१७२, नायगांव क्रॉस रोड,
दादर, मुंबई १४.

# अनुक्रमणिका


| अनुक्रम | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| | प्रस्तावना—न. र. फाटक | | | ५ |
| १ | जन्मभूमि | ... | ... | १३ |
| २ | जय महाराष्ट्र | ... | ... | १४ |
| ३ | शेतकऱ्याची माउली | ... | ... | १५ |
| ४ | गरीबांचे कैवारी | ... | ... | १६ |
| ५ | शेतकरी राजा ( भजन ) | ... | ... | १८ |
| ६ | ब्रह्मा, विष्णु, महेश ( भजन ) | ... | ... | २० |
| ७ | गोकुळ—कृष्ण—मुरारी ( भजन ) | ... | ... | २१ |
| ८ | सांब सदाशिव ( भजन ) | ... | ... | २२ |
| ९ | गुराख्याचं गाणं | ... | ... | २३ |
| १० | कामगारांची हांक | ... | ... | २४ |
| ११ | शेतकरी आमि झालों समदं लालबावटेवालं | ... | ... | २६ |
| १२ | मोटकरी दादा ऽ ऽ | ... | ... | २८ |
| १३ | कोळ्याचें गाणें | ... | ... | ३० |
| १४ | वादळांत ( कोळ्याचें गाणें ) | ... | ... | ३१ |
| १५ | न्याय अन्यायाची बात | ... | ... | ३२ |
| १६ | जीत गीत | ... | ... | ३४ |
| १७ | लुटावया जीवन भांडार | ... | ... | ३५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ तांबडं फुटलं | ... | ... | ३७ |
| १९ भलऽरी | ... | ... | ३८ |
| २० मालन कामानं सुकली | ... | ... | ३९ |
| २१ छाती असंल तर या | ... | ... | ४१ |
| २२ पुढं चला | ... | ... | ४२ |
| २३ उठली पुन्हां जनता | ... | ... | ४३ |
| २४ बर्फ पेटला | ... | ... | ४४ |
| २५ यारे ऽ यारे ऽ | ... | ... | ४५ |
| २६ दर्यावर तुफान आलं | ... | ... | ४५ |
| २७ जागा रहा | ... | ... | ४६ |
| २८ ज्यानी आम्हां गरीबास्नी नाडलं | ... | ... | ४७ |
| २९ जात्यावरच्या ओव्या | ... | ... | ४९ |
| ३० जात्यावरची ओंवी | ... | ... | ५१ |
| ३१ शाहिरास | ... | ... | ५२ |
| ३२ एकीचं रुमणं | ... | ... | ५४ |
| ३३ चले जाव ! | ... | ... | ५५ |
| ३४ तडजोड न्हायरं तडजोड न्हाय | ... | ... | ५७ |
| ३५ शेषस्तवन ( भजन ) | ... | ... | ५८ |
| ३६ गोवा गीत | ... | ... | ५९ |
| ३७ काँग्रेस बैलाला मत कसं द्यायचं | ... | ... | ६० |
| ३८ भलेबहाद्दर काँग्रेसवाले | ... | ... | ६१ |
| ३९ लावणी | ... | ... | ६३ |
| ४० समाजवादी छत्रपति अर्थात अमर अभिलाषा ( पोवाडा ) | ... | ... | ६६ |
| ४१ उद्धमसिंगाचा पोवाडा | ... | ... | ७९ |
| ४२ लावणी | ... | ... | ९४ |
| ४३ प्रणाम | ... | ... | ९५ |

# प्रस्तावना

कवित्वावर विशेष प्रेम नसणारालाहि आपल्याकडे आकर्षून घेण्याचें सामर्थ्य ज्या कवित्वांत आढळेल, त्या कवित्वाची प्रतिष्ठा मोठी समजावी, अशा भावार्थाच्या एका संस्कृत सुभाषिताचा अनुभव श्री. अमर शेख यांच्या कवित्वामुळें येऊं शकतो.. त्या कवींच्या काव्यांत राम नाहीं असें समजावें, हें हृद्‌गत त्या संस्कृत सुभाषितकारानें प्रथम सुचवून पुढें धनुष्य-बाणाचें ओझें अंगावर वहाणाऱ्या पुरुषाच्या दृष्टान्तानें तें स्पष्ट केलें आहे. ज्यानें सोडलेला बाण काळजाचा वेध घेऊन डोकें भ्रमायला लावीत नाहीं, त्या धनुर्धर पुरुषाच्या बाणांत जसा, तसाच त्या कवीच्या काव्यांत राम नाहीं, ज्याचें कवित्व हृदयाला स्पर्श करून डोकें गिरगिरायला लावीत नाहीं. सुभाषितकारानें कवित्वाचें क्रीडास्थान–विहारस्थान केवळ माणसाचें हृदय असल्याचें आपल्या उद्‌गारांत सांगितलेलें नाहीं. प्रथम त्याचा परिणाम हृदयावर घडला पाहिजे. परंतु तो परिणाम डोक्यांत चढणें अवश्य असा त्याचा कटाक्ष असल्याचें विसरून चालणार नाहीं. भावना हा हृदयाचा गुण आहे. परंतु तिची उचंबळ जर मेंदूला–बुद्धीला गुंगवून सोडील तरच भावनेला उचंबळविणारें कवित्व मोलाचें असें आपल्या या सुभाषितकाराचें तात्पर्य आहे. श्री. अमर शेख यांच्या कवित्वामध्यें सदर सुभाषितकारानें वाखाणलेलें सामर्थ्य आहे. श्री. शेख यांची कविता महाराष्ट्रांत आजवर पुष्कळांनीं ऐकलेली आहे. त्यांना गोड पहाडी आवाजाची देणगी असल्या-मुळें स्वतः ते आपली कविता गाऊं लागले म्हणजे हजारों खेडवळ स्त्री–पुरुष श्रोत्यांना कसे मुग्ध करून सोडतात हें सुद्धां पुष्कळांच्या पाहाण्यांत आलें असेल. निदान स्वातंत्र्यप्राप्तीनंतर—

हिंदी–संघ–राज्याच्या जन–आत्म्या तूं घेई प्रणाम
पराधीन जगताच्या दुर्दम दोस्ता घेइ प्रणाम

हें श्री. शेख यांचें ‘ प्रणामगीत ’ महाराष्ट्राच्या घराघरांतून कांहीं काळपर्यंत लहान लहान मुलेंसुद्धां गुणगुणत असल्याचे विस्मरण निदान इतक्यांत तरी सर्वांना पडलें नसेल असा भरंवसा आहे.

श्री. शेख हे वस्तुतः फारसे शिकलेले नाहींत. दक्षिण महाराष्ट्रांत त्यांचा जन्म झाला व त्यांच्या निष्ठाशील कर्तृत्वाला कम्युनिस्ट पक्षाच्या द्वारें जर योग्य अवकाश मिळाला नसता तर त्यांच्या कवित्वाला, काव्यगायनाला— एखाद्या त्यांतल्यात्यांत बऱ्याशा गणल्या जाणाऱ्या तमासगीराच्या मोलानें खपून जावें लागलें असतें. कदाचित् त्यांना पैसा व ऐषआराम आजच्या शेकडो पटीनें त्या स्थितींत अधिक लाभला असता; परंतु आज जो मान त्यांना मिळत आहे व सामाजिक क्रांतीच्या अग्रदलांतील एक वाङ्मय कलावीर म्हणून उद्यां जो मान त्यांना मिळणार आहे त्याकडे लक्ष दिल्यास त्यांच्या कवित्वगुणाची खरी कल्पना करतां येईल. कम्युनिस्ट म्हटला कीं वर्गकलहाच्या भूमिकेवरून तो सामाजिक व्यवस्थेचें निरीक्षण करूं लागतो व त्या व्यवस्थेंतील जे अल्पसंख्य प्रबळ घटक बहुसंख्य जनतेच्या श्रमावर चरत असतील त्यांच्या नाशानें एकंदर जनतेला सुखी करण्याची भाषा— तिच्यावर सत्य, अहिंसा या शब्दांची बेगड न लावतां—सडेतोडपणानें वापरतो, हें सर्वांना माहीत आहे. सत्य, अहिंसेच्या पुजाऱ्यांपैकीं पुष्कळांना आज वर्गकलह मान्य आहे. या कलहांत अहिंसात्मक म्हणून समजलें गेलेलें सत्याग्रहाचें शस्त्र उपयोगांत आणावें; या कलहांतल्या प्रबल प्रतिपक्षाच्या हृदय-पालटावर विश्वास ठेवून त्याच्या नाशाची भाषा बोलूं नये व क्रिया आचरूं नये, कम्युनिस्ट तशी भाषा वापरतात व सदर पुजाऱ्यांच्या समजुतीप्रमाणें क्रियाहि आचरतात म्हणून त्या पंथाला जनतेनें जवळ येऊं देऊं नये व सरकारनें सुचेल तो उपाय अमलांत आणून त्यास ठेंचून टाकावें असा त्यांचा अभिनिवेश आढळतो. येथें फक्त वर्गकलहाची स्थिति सत्य, अहिंसेच्या तथोक्त भक्तांनाही मान्य असल्याच्या मुद्दयापुरतें पाहावयाचें असल्यानें तेवढाच मुद्दा वाचकांनीं लक्षांत ठेवल्यास बरें. श्री. शेख यांचें कवित्व वर्गकलहानें भरलेलें आहे म्हणून बिचकण्याचें मग कारण राहणार

नाहीं. कम्युनिस्ट हा आपल्या तत्त्वज्ञानाप्रमाणें जनतेमध्यें राहून, राबून जनतेच्या सुखदु:खाचा ठाव काढून लोकजागृतीचें व लोकशिक्षणाचें कार्य करीत असतो. 'खानेकू हम और लढनेकू मेरा भाई' असल्या अंगचुकार तारतम्यानें तो वागत नाहीं, हे कम्युनिस्टांचे गुण त्याच्या शत्रूंनाहि नाकारतां येत नाहींत. त्याचें भय त्याच्या अविश्रांत व निर्भय स्वकार्य-निष्ठेच्या बळानें वाढूं पाहणाऱ्या लोकप्रियतेमुळेंच प्रतिपक्षाला वाटतें, ही गोष्टसुद्धां अगदीं स्पष्ट आहे.

कम्युनिस्टांचे हे सर्वसामान्य गुण ध्यानांत घेऊन व श्री. शेख हे एक मुरलेले कम्युनिस्ट आहेत या जाणीवेनें त्यांची कविता वाचल्यास त्यांच्या प्रतिभेची चमक दृष्टींत भरेल. ही कविता आरामखुर्चींत बसून चहाचा घोट घेतां घेतां दलितांचें दैन्य समजावून घेणारांकरितां प्रामुख्यानें नाहीं. तिचा रोख ज्यांना दिवसांतून एक वेळसुद्धां पोटभर जेवण मिळत नाहीं, मग इतर सुखविलासाबद्दल बोलायलाच नको—अशा करोडों निरक्षर जनतेवर आहे. या जनतेला वाली कोणी नाहीं म्हणून ऐक्य साधून स्वावलंबनाच्या पराक्रमानें आपला उद्धार साधावा, असें श्री. शेख यांच्या बहुतक कवितेचें 'ध्रुवपद' आहे. जनतेंत स्वोद्धाराची शक्ति आहे. पण ती शक्ति ऐक्याच्या अभावीं व्यक्तिव्यक्तिगणिक फुटलेली आहे. यामुळें कार्यक्षमतेच्या बाजूनें ती असून नसल्यासारखीच ठरते. श्री. शेख हे आपल्या अनेक कवितांमधून शेतकरी—कामकऱ्याला पुनः पुनः गर्जून सांगत आहेत कीं—'संघ—समुदाय निर्माण करा, त्याची कांस धरा आणि दुसऱ्याच्या औदार्याकडे लाचारीच्या आशाळभूत दृष्टीनें पाहात न बसतां आपले न्यायसिद्ध अधिकार आपल्या मनगटाच्या बळावर विश्वासून उपभोगूं लागा; तुम्हांला शासन करण्यासाठीं कितीहि प्रचंड सामर्थ्य एकवटून मग अंगावर आलें व तुमची एकी अभंग राहिली तर तें सामर्थ्य आल्या जागीं जिरून जाईल व तुम्ही विजयी व्हाल.' एका कवितेंत त्यांनीं शेतकऱ्याचे ब्रह्मा, विष्णु, महेश असे तीन अवतार वर्णून शेतकऱ्यानें फक्त ब्रह्मावताराची कामगिरी करीत जन्मोजन्मीं कां राहावें; असा प्रश्न

विचारला आहे. पुराणांतल्या अशा कितीतरी हृदयंगम कथा श्री. शेख यांनीं आपल्या ध्येयवादांत बेमालूम रीतीनें जिरवून शेतकऱ्यांनीं जें शिकायला पाहिजे त्यांत नवीन असें कांहींच नाहीं, हें दाखविलें आहे. या कवितासंग्रहांत शेतकऱ्याला अनुलक्षून जेवढ्या कविता आहेत तेवढ्या कामकरी वर्गाबद्दल नाहींत. याचें कारण उघड आहे. शेवटीं एक 'उद्धमसिंगाचा' (सहा चौकी मोठा) पोवाडा आहे. ज्या जालियनवाला बागेच्या कत्तलीमुळें महात्मा गांधींनीं स्वराज्यसाधनाच्या संग्रामाचें शिंग फुंकलें व संग्राम सुरू केला त्या कत्तलीचा सूड उगविण्यासाठीं महत्प्रयासानें इंग्लंडांत जाऊन कत्तलीचा हुकूमशहा जो ओडवायर त्यावर भर सभेंत पिस्तूल झाडणाऱ्या उद्धमसिंगाचें कथानक त्या पोवाड्यांत आहे. उद्धमसिंग पकडला गेला, त्यानें तुरुंगांत बेचाळीस दिवस अनुष्ठान आचरलें, शेवटीं त्याला फांशीची शिक्षा फर्मावण्यांत आली. ही गोष्ट १९४० सालीं तिकडे घडत असतां इकडे कॉंग्रेस महानुभवांनीं रामगड येथील अधिवेशनांत उद्धमसिंगाचा निषेध केला; इतरांनींसुद्धां हा कित्ता गिरवला; या संदर्भांत कॉंग्रेसवाल्यांना कांहीं प्रश्न विचारून,

कॉंग्रेसनं ठरवलं गुंड साऱ्या जनतेला
कॉंग्रेस विसरली साऱ्या क्रांतिकारकाला
विसरेल कसा जन दिव्य जालियनवाला?
विसरेल कसा कोण शूर उद्धमसिंगाला?
त्याचा शब्द कानामंदि । श्वास हिर्‍यामंदि
मूर्ति डोळ्यांमंदि दिसते । आज समद्याला
त्याला मुजरा करून । भक्ति गजरा करून
पवाडा ह्यो मनुन । अर्पितो शाहीर सिंहाला

याप्रमाणें श्री. शेख यानीं त्या पोवाड्याचा शेवट केला आहे.

गांधीजींच्या वधाबद्दल जातीयतेच्या दोषाच्या प्राबल्याची मीमांसा करून लोकांनीं नुसत्या शोकांत काल दवडल्यानें या जातीयतेच्या दोषाचें निर्मूलन व्हावयाचें नाहीं, शोकांत दवडलेल्या काळामध्यें तो जास्त पुष्ट

होईल. सूर्य मावळतांना गांधींचा जीवनप्रकाश विझला, या घटनेच्या आधारें श्री. शेख म्हणतात—

दृष्टिआड होतांना रविनें दिलें रक्त उधळून
हिंदु मुस्लिम एकजुटीची मशाल तेजाळून
मावळतांही सूर्य उगवतो उद्यां तुम्हां ठावें
मग कारे आम्हीं रडत बसावें अन् ठेंचाळावें ?

या कविता वाचतांना तिच्यांत प्रचार आहे यासाठीं ती तितकीशी उत्तम कलाकृति समजूं नये, असें मनांत किंवा जनांत बोलणारा एक वर्ग असल्याचें विस्मरून चालणार नाहीं. कला व प्रचार यांची सांगड घालणें गौण, किंबहुना कलेला हीनत्व आणणें होय, असा त्या वर्गाचा एक ठाम ग्रह आढळतो. स्वतः वाङ्मयद्वारा प्रचार करणारे सुद्धां या ग्रहाची कांस धरतांना दिसले म्हणजे हा ग्रह कसा जबरदस्त आहे याची कल्पना करतां येते. पण ते आपला हा बळकट समज किंचित् ढिला करून कुठल्याहि काळांतील वाङ्मयाकडे शांतपणें दृष्टिक्षेप करतील तर त्यांस दिसून येईल कीं, जुन्या काळांतील संतांचें वाङ्मय हें प्रचारात्मक आहे. त्यानंतर ज्याला केवळ देखाव्यावरून 'पंडिती' अशी कांहींशी नीचतादर्शक संज्ञा देण्यांत येत असते तें वाङ्मयसुद्धां प्रचारात्मक आहे. शाहिरी वाङ्मयांत प्रचार आहेच. पुढें इंग्रज राजवटींत उदयास आलेल्या वाङ्मयाचें अवलोकन केल्यास प्रचार नाहीं असें वाङ्मय बहुधा सांपडणार नाहीं. मग त्या वाङ्मयाचा प्रकार कादंबरी, नाटक, कथा, कविता, निबंध यांपैकीं कोणताहि असो. नांवेंच सांगूं लागल्यास लोकहितवादींपासून संपूर्ण महाराष्ट्रांतील आजच्या लोकां-पर्यंत नांवाची फार मोठी यादी वाढून सहज थोड्याशा आयासानें ध्यानांत येणाऱ्या विषयासाठीं निष्कारण जागा अडवावी लागेल. कोणाचा प्रचार फार उघडा व ओबड धोबड, राकट असेल तर कुणाचा प्रचार शिष्टपणाच्या सुकुमार संस्कारांनीं झांकलेला असेल. ज्यांना प्रचारार्थ कलेच्या बाह्यसौंदर्याच्या मोहांत रमण्याइतकी सवड असेल त्यांनीं या दुसऱ्या कलाकृतीचा गौरव अवश्य करावा. ज्यांना अशी सवड

नाहीं त्या अर्धनग्न, अर्धपोटी बहुसंख्य जनतेसाठीं श्री. शेख यांनीं कवित्व केलें असल्यामुळें त्यांचा प्रचार त्या जनतेच्या हृदयांस एकदम जाऊन भिडणारा अर्थात् ज्याचा अर्थबोध कठीण नाहीं अशा भाषेंत केलेला व त्या जनतेला नित्य परिचित अशा वृत्तांच्या साह्यानें केलेला असावा यांत नवल वाटण्यासारखें नाहीं. श्री. शेख यांच्या कवितांचें अनुकरण आपापल्या पक्षप्रचारासाठीं सांप्रत महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व पक्षांनीं चालविलें आहे हें ध्यानीं आणल्यास त्यांच्या कलाकृतीचा तो विजय डोळयांत भरण्यासारखा असल्याचें कबूल करावें लागेल श्री. शेख यांच्या कलाकृतींत अश्लील बीभत्साचा मसाला मुळींच नाहीं; हा त्यांचा विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. मोठाल्या सद्गुणांची वाचाळता करणाऱ्या पक्षातर्फे श्री. शेख यांना मागें टाकण्यासाठीं सरसावलेल्या नामी कलावंतांच्या कलाकृतींतील अश्लील बीभत्साच्या दुर्गंधी भपकाऱ्याचा बोभाटा वृत्तपत्रांतून जगासमोर आल्याचे प्रसंग सहज न आठवण्याइतके खचित् प्राचीन झालेले नाहींत.

हा कवितासंग्रह फार लहान कां याचें एक कारण महत्त्वाचें आहे. श्री. शेख यांच्या हस्तलिखित कवितासंग्रहाच्या वह्या सरकारनें जप्त केलेल्या असून त्या सरकारकडून लवकर परत मिळण्याची आशा संपुष्टांत आल्यावर ज्या कवितांचें गायन लोकांपुढें वारंवार झालेलें होतें त्या पुन्हां पुन्हां आठवून, जुळवून श्री. शेख यांनीं आणखी एकदां तयार केल्या. उद्धमासिंगाच्या पोवाड्यांतील सुमारे दोन चौकांइतका मजकूर विस्मरणांत तूर्त तरी गडप झालेला आहे. अशा रीतीनें त्यांच्या स्मृतीकडून जन्म पावलेल्या या कविता मुद्रितांच्या अवस्थेंत महाराष्ट्रापुढें आज जात आहेत. आजच्या काळीं हस्तलिखिताचा पूर्वोक्त वृत्तांत न विसरल्यास हें एक प्रकारचें साहसच म्हणावें लागेल. येथेंहि एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. श्री. शेख यांचें 'प्रणाम' गीत रेडिओवरून गाईलें जाण्याचा योग त्यांतील भारताच्या विभागणीचा मजकूर कुठल्या तरी दूरच्या अधिकाऱ्यांना खटकल्यामुळें टळला व तो योग जो एकदां टळला तो कायमचाच. हल्लीं वाङ्मयांत आक्षेपार्ह काय आहे व काय नाहीं हें ठरविण्याचा हक्क पुष्कळदां सरकारच्या अभिमानानें सरकारांत

निनांवी पत्रें गुदरणारे चुगलखोर गाजवीत असतात. सरकारी अधिकाऱ्यांसमोर विधिपूर्वक प्रामाणिकपणानें केलेल्या ॲफिडेविटला सध्यां किंमत नाहीं. अशा चुगलखोरांच्या निनांवी पत्रांचा भाव मात्र वधारलेला आहे. श्री. शेख यांच्या जाहीर सभांतील कवितागायनाला वारंवार सरकारी अडथळ्यावरून उड्या माराव्या लागतात. पण या स्थितीला भिऊन काय होणार ? शिवाय कागद व त्यावरील शब्दसमूह सत्तेला नाहींसा करतां येतो. प्रसंगीं शब्द निर्मात्यालाहि लोकांच्या नजरेआड कांहीं काळ वा कायमचें करणें सत्तेच्या आटोक्यांत असतें, पण त्या शब्दांतला विचार लोकहिताचा म्हणून लोकप्रिय असेल तर तो इहलोकींच्या कुठल्याहि सामर्थ्याला दडपून टाकतां येत नाहीं; ही इतिहासाची साक्ष मनावर घेऊनच श्री. शेख यांनीं आपल्या कवितांचा मुद्रणावतार लोकांना सादर केला आहे. लोकप्रियतेची खात्री त्यामागें आहेच. ती लोकप्रियता यापुढें वाढेल असा म्हणूनच विश्वास बाळगतां येतो.

मुंबई, २५ मार्च १९५१. — न. र. फाटक

# म नो ग त

‘ अमर गीत ’ आज जें जनतेसमोर येत आहे, तें अनेक दिव्यांतून, बाहेरच्या व आंतल्या संकटांना तोंड देऊन जनतेसमोर येत आहे. पण तरीही तें पूर्णत्वानें जनतेपुढं आलेलं नाहीं.

काळाच्या ( सध्याच्या सरकारच्या ) दाढेंतून जें वाचलं तें, आठवणींनीं जें आणून दिलं तें, आणि माझ्या गीतांच्या चाहत्यांनी काळजाला लावून जें ठेवलं तें, तेंच फक्त या ‘अमरगीता’च्या रूपानें बाहेर पडत आहे. म्हणून माझा हा पहिलाच गीतसंग्रह जनतेच्या हातीं देतांना माझा आनंद अगदीं खुल्या दिलानें मला व्यक्त करावासा वाटतो. तसेंच या ‘अमरगीता’ला पुढें येऊं देण्यासाठीं ज्यांनीं हातभार लावला त्या सर्वांना धन्यवाद देणें माझें कर्तव्यच ठरतें.

आणखींही कांही गीतं मला जनतेपुढं ठेवतां आलीं असतीं. पण ठाणे पोलिसांनीं माझ्या हस्तलिखिताच्या तीन वह्या, ठाण्याच्या एका साहित्यिक मित्राकडून झडतीच्या नांवाखालीं नेल्या—

मी १९३० सालापासून गीतं व पोवाडे लिहीत आलों. तीं सारीं गीतं, पोवाडे, त्यांनी नेले. तें सारें साहित्य अजूनही सी. आय. डी. खात्याच्या दप्तरांत पडून आहे.

१९५० च्या मे–जूनमध्यें मुंबई सरकारनं दडपशाहीचं समर्थन करतांना एक गोष्ट जनतेला सांगितल्याचं आठवत असेलच. त्यावेळीं—मुंबई सरकार म्हणालें होतें, “ पहा हो ! हे लोक आपल्या भजनांतून सुद्धां समाज-शंकराला तिसरा नेत्र उघडायला सांगतात. म्हणून आम्हीं यांना व यांच्या वाङ्मयाला दडपून टाकीत आहोंत. ” बिचारं सरकार ! त्याच्या अपेक्षा

( पान ९७ पहा )

# जन्मभूमि

( मेरि जन्मभूमि — शैलेन्द्र )

जन्मभूमि–प्रिय माय जन्मभूमि
आकाश निळे नीलमणी धरति सुवर्णा
चंदेरि नद्या वाहति भोंति हरित गालिचा
वायुमंद गीत–गंध उधळि दशदिशा
करि पुलकित क्षणक्षणास जीवन आशा
माय जन्मभूमी अशी थोर जन्मभूमी
प्रिय मला ही माझी माय थोर जन्मभूमी ॥

विशाल भाल हिमगिरी अभिमान आम्हाला
भारतियांना
अर्पितसे भानु जगतिं रश्मिची माला
सर्वां आधिं ज्याला
माय जन्मभूमी अशी थोर जन्मभूमी
प्रिय मला ही माझी माय थोर जन्मभूमी ॥

स्वर्ग आला भूवरती दास होउनी
रूप मुग्ध सिंधु सतत चरण चुंबुनी घेई
धन्य मानुनी
जन्म धरतिवरती या धन्य आम्ही ते
पूजुं पूज्य मायभू ही गाउनि गीतें
थोर जन्मभूमी अशी थोर जन्मभूमी
प्रिय मला ही माझी माय थोर जन्मभूमी

१४८०८

# जय महाराष्ट्र

जय महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्राच्या गाऊं गाना ।
गाऊं उंचावुनी माना । घेऊं तानावर ताना ॥

भाषेचा थाट मराठी । अहिराणी कोंकणी घाटी
शब्दोच्चाराची खोटी । शत्रुला वाटते धास्ती
ज्ञानेशापासुनि भिल्ल वारली । घेई नित नवरसना ॥

सौंदर्य महाराष्ट्राचें । क्षणक्षणा प्रत्यया येतें
माती सुगंध उधळीते । दरिकपार रिझवि मनातें
गोमांतक, वेरूळ दावि अजंठा । अमर मानवी स्वप्ना ॥

कोयना नी गोदा, कृष्णा । भागवुनी आमुची तृष्णा
उदरांत मोति पिकवोनी । महाराष्ट्र उभा सुखवोनी ।
कधीं उग्ररूप खंदकरूपानें पाणि पाजि शत्रूंना
जय महाराष्ट्र ॥

जणुं संताजी अन् बाजी सह्याद्री सातपुडादी ।
आजही छाती उघडोनी । गर्जतसे पर्वतराजी ।
घाला घण आमुच्या छातीवर अन् पाहा मराठी बाणा
जय महाराष्ट्र ॥

या पर्वतराजी कसल्या । कर्वतीच तापविलेल्या ।
महाराष्ट्राभोंवती पसरल्या । अरिसेना ज्यांनीं चिरल्या ।
ही परंपरा घेऊन मिरवितो । आमुचा मावळ तान्हा
जय महाराष्ट्र ॥

अन् इतिहासाचीं पानें । भरलीं सारी अभिमानें ।
शतकानुशतक पहा वळुनि । लिहिलीं आपुल्या रक्तानें ।
घेऊनि स्फूर्ति त्यांतून जागवूं जगत शक्तींना
जय महाराष्ट्र ॥

कानडी, हिंदी, गुजराथी । आंध्र ओरिसाही साथी
राखुनि त्यांच्या हक्काला । बांधुनी लोकराज्याला
मुंबईपासुनी नागपूर सुखसनद वाटूं सकलांना
जय महाराष्ट्र ॥

स्वातंत्र्य शांतता स्थापूं । अवघें जग त्यानें व्यापूं ।
फडकवूं ध्वज समानतेचा । पर्वा न जिवाची करतां
संयुक्त महाराष्ट्र दाखवूं । विभवाप्रत चढतांना
जय महाराष्ट्र ॥

# शेतकऱ्याची मावली

किसान सभा शेतकऱ्याची मावली
सुखाची सावली, हाय वो ॥ धृ. ॥
पोराबाळांचं बगून हाल
हातीं दिलाय तिनं बावटा लाल
इळा हातोडा केला बहाल
एकी करा मन सांगितलं हाय हो ॥
किसान सभा शेतकऱ्याची मावली ॥ १ ॥
आईच्या शब्दा मान देऊन
मेंबर व्हा ' एक आना ' देऊन
सांगा जगापुढं छाती काढून
किसान सभेचा मी मेंबर हाय वो ॥
किसान सभा शेतकऱ्याची मावली ॥ २ ॥
सावकारीचा तोडील फास
पोराबाळांस्नी सुखाचा घास
घरांत आनिल सर्गाचा वास
सुखी दिवस तीच दावणार हाय वो ॥
किसान सभा शेतकऱ्याची मावली ॥ ३ ॥

# गरिबांचे कैवारी

गरिबांचे कैवारी मनत्यात । मनत्यात
गरिबांची नरडी कापत्यात ॥ धृ. ॥
सोटा लोटा आनूखी लंगूटा
घेऊन येत्यात आमच्या गोटा
तोंडावर फेकत्यात एक दोन नोटा
दस्तैवज मग करत्यात खोटा
घरादाराचा काढत्यात काटा
रस्ता दावत्याती कचेरीन् कोर्टा
आकरिला मारत्यात टाळक्यांत सोटा
मानेवर सुरि हळु ठेवत्यात–हळु ठेवत्यात
खसा खसा माना कापत्यात ॥ १ ॥

रुपया दोन रुपयं हातीं देउनी
दामदुपटीचा कागुद घेऊनी
याज वरीवरी वसुल करूनी
मुदलाचा डोंगुर तसाच ठेवुनी
शेतिवाडी हिस्काउन् घेउनी
घरातलं दानं समदं नेउनी
गुराढोरांची वाट लावुनी
याजावरती राबाय् लावुनी
उपास पोटि आम्हाला, ठेवत्यात, अहो ठेवत्यात
मालक मनवुन घेत्यात ॥ २ ॥

आम्ही उपाशी धान्य पिकवुनी
नेलं धान्य त्यानि ठेवलं दडवुनी
आण्याचं धान्य विकलं रुपयानीं

शेतकरी समदा येड्यावानी
अन्न अन्न करि समद्या रस्त्यानी
दाद घेइना त्याची कोनी
रस्त्यात पडला मुडद्यावानी
देवाला निवद हे दावत्यात, अहो दावत्यात
पायाखाली शेतकरि मरत्यात ॥ ३ ॥

टोपि पांढरी डोक्यावरती
मजुरावरती गोळ्या झाडती
कुणी मालकाचे बूट चाटती
शेतकऱ्यांच्या झेंड्यावरती
शेणचिखलाचा मारा करती
कॉंग्रेसला काई पैसं देत्याती
निवडून यायची धडपड करती
देशभक्त कधि बनत्यात, अहो बनत्यात
देशी सुऱ्या हातीं घेत्यात ॥ ४ ॥

त्यांचीच पोरं चैन करत्याती
दारू, तमाशा, बाईल ठेवत्याती
हिकडं त्यांचं बाप माना मोडत्याती
बंगल्यांचे दोन बंगले करत्याती
मोटारिवरती मोटार घेती
जिम्लेट आम्लेट, खाया लागती
पंच पक्वान्नं ढेरी वाढविती
ढेरीवर उंदरं खेळत्यात खेळत्यात
वर्ति रिकामं पोट ह्राय मनत्यात ॥ ५ ॥

लाल बावटा आमच्या हातीं
इळाहातूडा ज्याच्यावरती

तीच हत्यारं आमुच्या हातीं
एकजुटीची मशाल वरती
आतां कशाला कुनाची भेती ?
गरिब तितके सारे एक झाल्याती
एकीचा हातूडा आतां टाळक्यांत बसंल टाळक्यात
सावकार थराथरा कापत्यात ॥ ६ ॥

# शेतकरी राजा

(भजन)

ज्ञानबा तुकाराम । ज्ञानबा तुकाराम
शेतकरि राजा । ज्ञानबा तुकाराम
शेतकरि राजा । शेतकरि राजा

आलं दिवस तुझं नको घाबरूं सोनं निघंल तुझ्या मातितनं ।
शेतकरि राजा ॥

पिकवलं आजवर रान शक्तीनं पिकव आतां तूं युक्तीनं
शेतकरि राजा ॥

पिकव पिकव त्वां रान पिकिवलं खाल्लंय समदं चोरानं
शेतकरि राजा ॥

चोरावर मोर बघ झाले शिरजोर, खोत सावकार फिरत्यात ऐटीनं ।
शेतकरि राजा ॥

श्रीकृष्णाचा छळ मांडिला मामा होउनि कंसानं ।
ऐक बघ राजा ॥

मरता मरता सुद्धा पश्चात्ताप कधि दावला न्हाईरं कंसानं ।
शेतकरि राजा ॥

रावण गेला न्हाई कंस मेला न्हाई सीतामाइच्या शापानं ।
श्रीकृष्णाच्या कोपानं

शक्ति–युक्तिनं एक होउनं रान काढलं सारं खुरपून ।
शेतकरि राजा ॥

शेतकरि झाला कृष्ण–सीतामाई दुःखकष्ट त्वां दारुण
शेतकरि राजा ॥

कंस रावणाचा अवतार घेतला सावकारशाही सरकारनं
ऐक बघ राजा ॥

दुःखकष्टाची सीमा संपली ऊठ अतां तूं त्वेषानं ।
शेतकरि राजा ॥

किसान सभेचा बळकट नांगर फिरव च्योरांच्या घरावरनं ।
शेतकरि राजा ॥

किसान सभा तुझि बळकट झाली, सावकार जाइल गुदमरून ।
भांडवलशाही कोलमडून ॥

काळी आई तुझि देइल आशिर्वाद टाकिल सोन्यानं मडवून ।
शेतकरि राजा ॥

# ब्रह्मा–विष्णु--महेश

(भजन)

जय जय राम कृष्ण हारी—जय जय राम कृष्ण हारी।
राम् राम् राधे कृष्ण हरी—राम राम राधे कृष्ण हरे राम।
राम् राम् राधे कृष्ण राधे—शेतकरि भोळे कृष्ण माझे।
भोळा राजा कुणबि हरे राम–राम् राम् राजा कुणबि हरे राम ॥ धृ ॥

काळ्या आईचा सखा पुत्र तूं तूंच खरा घनशाम।
राजा कुणबि हरे राम–ओ राम राम राजा कुणबि हरे राम ॥
ब्रह्मा होऊन तूंच निर्मिलें–निर्मियलें जग सारें ॥
दरी डोंगरी फोडून सगळे–विश्व सजविलें न्यारें
गाळुनिया तूं घाम–माझा राजा कुणबि हरे राम ॥ १ ॥
विष्णु होऊन तूंच पोशिलें–पोशियलें जग सारें
वाळवंट ओसाड माळकां–उभी धान्य कोठारे
नामा निराळा राम–माझा राजा कुणबि हरे राम ॥ २ ॥

महादेव तूंच पार्वति शंकर–रूप कधीं तव महाभयंकर
त्रिभुवन जाळुनि भस्म लावुनी–पुनः तूं भोळा सांब
तूंच तो राजा कुणबि हरे राम–राम राम राजा कुणबि हरे राम ॥
नाहीं तुला टिचभर निवारा तोच ब्रह्म तूं का ?
नाहीं तुला कुटकाहि खावया विष्णु उपाशि उभा
नाहीं तुझ्या हातिं मृत्यु राहिला रे भोळ्या सांबा
घालुं लागले नीच दैत्य या जगामध्यें थैमान
ऊठ हे राजा कुणबि हरे राम–राम् राम् राजा कुणबि हरे राम ॥ ४ ॥

घे हिसकुन् या साऱ्या जमिनि, घे ब्रह्माचा अवतार
पहिलें खा तूं विष्णु होउन्, जगुन जगाला तार

उघड नेत्र तो तिसरा भयंकर लालेलाल अंगार
ऐतखाऊंचे कर निर्दालन घेई रुद्र अवतार
ऊठ हे सर्व व्यापि भगवान, राम् राम् राजा कुणबि हरे राम ॥ ५ ॥

गदा, चक्र अन् त्रिशूळ झालीं जुनीं तुझीं अवजारें
शंख, डमरुचा आवाज येना, ठेव तूर्त तें सारें
पद्म पोथिचीं गळलीं पानें, नको सर्प निष्प्राण
घेइ आतां ही एकजुटीची मशाल उचल निशाण
पेटव कुजकें सडकें रान—ऊठ रे राजा कुणबि हरे राम ॥ ६ ॥

# गोकुळ--कृष्ण मुरारी

(भजन)

जय जय राम कृष्ण हरी—जय जय राम कृष्ण हरी ॥ धृ ॥
माधव तूंच मुरारी रे—कुणब्या ऊठ मुरारी रे—राम कृष्ण ॥

धनधान्यानें भरलें गोकुळ
आज भुकेनें झालें व्याकुळ
तूं सजवुन वृंदावन मधुबन
तिथें नाचती सावकार हे आज ऐदि माजोरी—जय जय राम ॥ १ ॥

दिसत न गाईचीं खिल्लारें
गोप वासरू हुंदडणारें
दुध लोण्याचा दुकाल आला
तळमळती बघ तान्हि लेकुरें
दलाल, आडते सुखी खाउनी ओकती वीष्र विखारी ॥ २ ॥

सावकार रेडा मोकाट् सुटला जरा बाजूला लपा रं
एकीचा सोड्गा, एवढाच तोड्गा, देऊं एकीला जपा रं ॥
ढव्ळि म्हैस दोई अंगि चालली, मोहाला बळि पडुं नका रं
सोन्याचि सुरि न्हाई घेयाचि उरि जपुन जपुन तिला हाका रं ॥
रानबी खाईल दुधबी जाईल हातांत धुपाटनं बघा रं
म्हशीच्या म्हागला बिर्ला दादला देइल शेवटीं दगा रं ॥
लाल चिंधिला बुजति जित्रापं बोल थोरांचा बरा रं
आपल्या रक्तामंदि भिजवुन चिंधि तिचा बावटा करा रं ॥
बांधा बांधावर लाल बावटा हुबं राहूं बाजुला रं
किसान् सभेचं काटेरि कुपंण ह्योच मार्ग आपुला रं ॥

# कामगारांची हांक

अरे आ ऽऽऽऽऽऽऽऽऽऽ आई आह ! आ : !
मोलमजुरी करून रात दिवस खपुन्
आमा पोटाला खायाला नाय हो-होय हो होय ॥ १ ॥

भणंग कामगार :-आमचं घरदार घुबडानं लाटलं
खुराड्यांतच बिऱ्हाड थाटलं
रस्त्यावरतीं म्या टाकलंया खाटलं
आमा राह्याला घरदार नाहीं त नाय
आमा लवंडाया रस्ताबि नाय हो-होय हो ॥ २ ॥

बेकार कामगार :-बारा वर्स म्या जोडी चालिविली
बिन गुन्ह्यानं नोटीस लाभली
वाट फाटकाची मालकानं दावली
आमा गेरंटि कामाचि नाहीं त नाय
आमा बेकार-भत्ताबि नाय हो होय हो ॥ ३ ॥

अनुक्रम.................... दि: ....................
नोंद दि: ....................

आजारी कामगार :—माल काढुन् जगाला पुरिवला
देशासाठींच ह्यो देह झिजला
रोगराईनं भरपूर कुजला
हक्काची न्हाई रजा पडलो आजारी मी
आजारीपन्‌चा भत्ताबि नाय हो—होय हो ॥ ४ ॥

बाई कामगार :—घरामंदी मी राब राब राबले
काम करून गिर्नींत दमले
मला अखेरिला पोट भवूले
फुटक माझं नशिब झाले बाळंत मी
पैसा दुधाला तान्ह्याच्या नाय हो होय होऽ ॥ ५ ॥

म्हातारा कामगार :—सारी ह्यात साच्यांत् नासूली
राख हाडांची साच्यास्नि फासूली
गिर्निमालकाची तिजोरी हासली
जीव गेला थकुन् काडिमोडी होऊन
आता माझ्यानं काम होत नाय हो—होय हो ॥ ६ ॥

सगळे :— ते बघ ते बघ आला लाल बावटा
हाती घेऊन एकीचा सोटा
काढं म्हणतोय चोरांचा काटा
भंवला देशाला बेकीचा नायटा
एकीच्या कोणी चाले ना वाटा
वाहती आपसांत रक्ताच्या पाटा
जो तो उडवीतो दुहीचा फुपाटा
समद्या दुःखाला बेकीला झोडून काढाया
बावट्याला घेउन जाऊ हो—होय हो ॥ ७ ॥

# शेतकरी आमि झालो
# समदं लालबावटेवालं

शेतकरी आमि झालो समदं लाल बावटेवालं
देऊं एकीचा रट्टा ठेवुन आडवाया कुनी आलं ॥
मत मागाया म्हागं आलं बातान् थापा घेऊनी
लाडू, जिलेब्या, तेलच्या, बासुंदी आणखी गुळवनी
म्हागंपुढं न्हाई बघितलं त्या धाडिलं आमि निवडुनी
जनु घेतलं इकतच आमाला गेले समदं इसरूनी
आला अनुभव झालो आता लालबावटेवालं ॥ १ ॥

द्या लाडू द्या जिलेब्याबी द्या, तेलच्याबी खाऊं आमी
मोटारी द्या, तांगे बी द्या, येऊ आम्ही त्याच्यांतुनी
बाता बी द्या, थापा बी द्या, सिगरेटी पानं देऊनी
घ्या हात समदे लाल करूनि लाळ थुंकी झेलुनी
जमातिला आमी आमच्या जागूं लाल बावटेवालं ॥ २ ॥

ठाऊक हाये सारं आमा, मोटारी ह्या कुठुनी आल्या ?
बापजाद्यांनीं कुणाच्या मेहनतीनं मिळविल्या ?
कुनि कुळवलं रान, केलं धान, खस्ता काढल्या ?
बाजार काळा करुनि दिवसाढवळ्या माना कापल्या
धागा दोरा समूदं शेतकरी वळखायाला लागलं ॥ ३ ॥

पेंडि कडब्याची उचलली न्हाई आपानं कधीं
पेंडीचा बाजार काळा केला समद्याच्या आदी
बैलं पान्यावर्ती पाजुन शेतिला पानी कधीं
न्हाई पाजिलं पण पाजिलं हो कुणब्याला पानी आधी
पानी पाजणाराचे हात हुडकतो आम्ही बावटेवालं ॥ ४ ॥

न्हाई हाकल्या मोटा कधी, न्हाई कासरा हाति घेतला
पर कासऱ्याचा फांसा आम्हां शेतकऱ्याला लावला
दुनिया जगावी म्हणुन आम्हीं धान होतं पिकीवलं
बळदांत दडून ठेविलं, आम्हा उपाशी मारिलं
अन्न–चोरांची घरं हुडकतों आमी बावटेवालं ॥ ५ ॥

धोटा हाती कुनि घेतला, कुनि बघितलं बाबिन पिकास ?
अग्नींत मसनींच्या कुणाचा झाला पुर्ता सत्यानास ?
त्या अग्नीवर्ती भाजुनी पोळ्या कुणा मोत्याचा घास
मिळतो कुणाला लोड तक्या मिळती मोटारी झकास
त्याच मोटारीची किल्ली हुडकतो आमी बावटेवालं ॥ ६ ॥

बगळा दुधावानि पांढरा ध्यानस्त बसला होऊनी
सांगेल मासं खायचं म्या सोडलंय आजपासूनी
घारी गिधाडं मासकंड देत्याल कां हो टाकुनी ?
रंग टुपिचा जरी पांढरा इस्वास ठेवावा कुनी ?
मूळ जातिलाच वळखतो आमी लाल बावटेवालं ॥ ७ ॥

हे समदं आमचंच खात होतो, अन् आमी खानारबी
हो जबरदस्ती जुलूम आमि शपथ घेणार बी
चोरापुढं ज्या घेतल्या शपथा कुणी पाळील् कशा ?
वाटेमंदी कुणी आडवलं, वाटा आमी काढूं तशा
गळेकापूंना वळखतो आमी लाल बावटेवालं ॥ ८ ॥

देशामंदी एकी करूं एकी करित असत मरूं
अन्याय जुल्माला चिरूं अन् राज्य जनतेचं करूं
त्या जनतेच्या राज्यामंदी कुनि न्हाई मालक अन् गुलाम
पोटभर खाऊन सुखानं जय बावट्याचा करूं
लाल बावटे की जय गाजवाया शेतकरी बघा आलं ॥ ९ ॥

# मोटकरी दादा ऽ ऽ

एऽ मोटंच्या मोटकरि दादाऽ
मोटंच्या मोटकरि दादा...
मोटंच्या मोटकरी दादा–थकुन् नको जाउं मोट चालवुनी
थोडा घे तूं इसावा बगरं जरा-कुटं जातंय् पाटाचं पानी ॥धृ०॥

भल्या पहाटं मोट त्वां धरली
आशेमुळं तहान् भुक हरली
राबूराबुन शक्ति न्हाइ उरली
येती कसली फळं, तुझ्या करणीमुळं, थोडं बग रं मोट थांबवुनी ॥

आलं इलक्सनाचं वारं—मोटकऱ्या
दिलं काँग्रेसच्या हातीं तू खोरं–मोटकऱ्या
अन् धरायुला सांगितली दारं–मोटकऱ्या
मोठ्ठा इमानि चाकर–टाकी भराभर–समदं रान जाळुनी ॥

वाफा शिक्षक जळतो बिचारा
खातो दर्याचा गार गार वारा
पितो आपल्याच घामाच्या धारा
कसं तरी जगुन, उभं जळुन जाउन् नास होईल सोन्याची खानी ॥

बाग कुनब्याची गेली रं सुकून–बग जरा
तिच्याकडं बग ना यो ढुकून–बग जरा
सौराज्याची फळं, सांग अशामुळं सख्या येत्याल का उगवुनी ॥

सारा कोर्डा कामगाराचा वाफा
पाण्याविना टाकतोय धापा
मंत्रि देतोय थापावर थापा
कायद्याचं दगड, तोंडावरती रगड, ठेवल्यात रचुन चाकरानीं ।
कधि सोडि वगळीलाच पानी
हिंदु–मुस्लिम वाफ्यातुनी
गेलि रोपं कितीक वाहुनी
दिली सायबानं मेढ, हिंदु-मुस्लिम तेढ, तिला घालीत सुटतोय् पानी ॥

धनिकांचा पिकिव्तोय् मळा रं–बग जरा
टाटा-बिर्लाच्या पडतोय् गळा-रं बग जरा
वर्ति जप्तोय् तुळशीच्या माळा-रं बग जरा
बुवाबाजी करुन् तुला टाकिल मारुन तुझि समृदि बाग जाळुनी ॥

दे तूं भावाच्या हातांत खोरं–मोटकऱ्या
लाल बावट्याला धरू दे दारं–मोटकऱ्या
किल्ल्या टाकूं नको चोराम्होरं –मोटकऱ्या
थोडि न्ह्यारी करून, बैला पानी दावुन, गा तूं मोटंची मोटकऱ्या गाणी ॥

# कोळयाचें गाणें

ओ ऽ ऽ ऽ . . . ओ ऽ ऽ ऽ . . . ओ ऽ ऽ ऽ . . . ओ ऽऽ
जाती घडी पुना येणार नाय रे
घुसुन् चला पुढं जाऊं रे ॥
गेलं तुफान तसं आलं उधान
आतां माघार घेयाची नाय रे, नाय रे

तुफान दर्या उफाळला
भेती कुनाची सांगा मला
कोळ्याचं प्वार कधिं भेतं त्याला ?
डावपेच खेळायचे दिवसबी गेले
समुर समुर आता जाऊं रे . . .जाऊं रे

गावलं आमाला जाळंबि लाल ।
गड्या उगवला ताराबि लाल
करू कमाल आमि कोळ्याचं लाल
मोट्टं मोट्टं मासं आलं धारीला ।
चौकून घेरायचं हाय रे . . . हाय रे

बोयर मासा आला घेरा ।
नोकरशहा ह्यो बघा जरा ।
एकीचं जाळं जरा हुशार धरा
बावट्याची निशानी होताच समदे
तुटून पडायाचं हाय रे . . . . . .हाय रे

सावकारशाहीचा पाप्लेट आला
दयामाया न्हाई घाला घाला
एकीच्या डोलींत पगूवा त्याला

बारिक बारिक मासं खाऊन मातला
पालि आता याचि हाय रे . . . हाय रे

गावचा गटार मासा आला ।
काळा बाजार ज्यानं चिकार केला ।
काढून वाळूवर फेका त्याला
साधंसुधं म्हावरं नको आमाला
चांगलं चुंगलं आता खाव रे...जरा

जनतेच्या क्रांतीचं उधान आलं ।
बावस्यानं एकीचं जाळं दिलं ।
मदतीला लाल झंडेवालं आलं
(लाल) बावस्याला खांद्यावर घेऊन आतां
चोरास्नि झोडायचं हाय रे...

शब्दांचे अर्थ—

उधान–भरती, बोयर व पाप्लेट–चवीला सर्वांत चांगले मासे
डोली–भक्कम जाळें; पगवा–धरा; म्हावरं–मासे.

# वादळांत

## (कोळ्याचं गाणं)

सुटला वादळि वारा–वल्हव जोमांत जरा
गाठूं किनारा रे–गड्या–गाठूं किनारा रे ॥ धृ ॥०
उजविला महागाई बेकारीचे खडक–बसेल धडक
हेरून ठेव हा माराया धडक–फोडाया खडक
दिवा लाल डावीला वल्हव तडक–'येशा' बेधडक

तिकडंबि पाऊस गारा, जनुं मशीनगन्‌चाच मारा
झुंझुं गाठूं किनारा रे—गड्या गाठूं किनारा रे ॥ १ ॥

भांडवलि लाटांची भेती कुनाला, आमा कोळ्याला ?
छातिवर नाचाया जल्माला आला, भेतोयूका त्याला ?
डोंगर लाटेचा समुरनं आला तुडवून त्येला
एकीचा करून पुकारा, वल्हं डावीला नेटानं मारा
झुंझुं गाठूं किनारा रे—गड्या गाठूं किनारा रे ॥ २ ॥

किनारा गाठूंच घाई नको रं—धीरानं घ्यारं
दर्यांत हिंमतीनं डोली टाकारं—म्हावरं धरारं
म्हावऱ्यासाठीं नाव लोटलिया ना रं ? —काळाच्या म्होरं
( मग ) काळावरी चाल करा अन्‌ भरभर म्हावरंबि धरा
झुंझुं गाठूं किनारा रे—गड्या गाठूं किनारा रे ॥ ३ ॥

म्हावऱ्याईना कोलि जगनार नाई—इलाज नाई
आपल्यातनं पडत्याल लडतांना काई—पर्वाबि नाई
झेंडा रक्ताचा त्येंच्या उभारा—शीड त्येस्नीच समरून हाकारा
मग तुफान, लाटा, गारा, त्याच अपसूक घेत्याल निवारा
झुंझुं गाठूं किनारा रे—गड्या गाठूं किनारा रे ॥ ४ ॥

# न्याय अन्यायाची बात

न्याय अन्यायाची बातच न्हाय्‌—आतां बातच नाय
भांडवलशाही सर्कार ठेवायूचं नाय्‌—आता नाय नाय
चोराला मलिदा चारायूचा नाय्‌—आता चारायचा नाय्‌
सोंगाडा न्याय अमा ठाऊक नाय्‌—आता नाय नाय्‌ ॥ धृ० ॥

तुमचं धोरन् फाटाफुट। करून ताटातूट। केली लुटालूट–
हिशोब नाय्–तुमि केलि लूटालूट, हिशोब नाय
बंद करा चाळं। लावूं तोंडा काळं। खणूं पाळं मूळं–
जाणुनबुजून समदं ठरविलं हाय्–आता ठरविलं हाय
झोटिंगशाही मुळी ठेवायची नाय्–आता नाय नाय् १

तुमी झाडा गोळी। छातीची ही झोळी। घराची तर होळी–झालेली हाय।
आमच्या घराची तर होळी झालेली हाय
रक्ताच्या बदल्याला। रक्तच द्यायाला। समदा खवळलेला
मजूर शेतकरि तय्यार हाय आता तय्यार हाय
झाली लढाई सुरू थांबायची नाय् आता नाय नाय् २

मोठमोठ्या मुत्सद्यांला। घ्या तुमि साथीला। तोफा बंदूकीला–
तोटाच नाय–तुमा–तोफाबंदूकीला तोटाच नाय
पोटाच्या अग्नीला। पचवून जावला। पर्त्यक्ष देवाला–
खरं सांगूं ? राजे जमायूचं नाय–जमायूचं नाय
लुंग्या सुंग्यांचं तर कामच नाय आता नाय नाय् ३

कुत्री मांजूरं सुद्धां समद्या देशांतली।
रंगढंग सारं ओळखाया लागली।
फाडून टाकत्याल पन शिवायूची नाय।
तोंड लावायूची नाय्–पुनः लावायूची नाय
घारी गिधाडांस्नि तोटाच नाय–आता नाय नाय ४

ह्या राजामहाराजांचं शेपूट कापून।
रानीच्या बागंत ठेवायूचं जपून।
ठान्याचा दवाखाना झोकाचा हाय।
त्येस्नी सुखाचा हाय।
यापुढं राजांचं कामच नाय–आता नाय नाय् ५

जमिन्दारी पासूनं जमीन हिस्कुन् ।
भांडवलशाहीला लावायचं हुसकुन ।
तड्जोड बिडजोड आमा ठाऊक नाय–आमा ठाऊक नाय–
जनतेनं एकीनं ठरिवलं हाय्, आता हाय हाय ६

# जीत गीत

घेऽउं हातीं हातोडा न् कोयता
जाऽउं आतां गान गात रे ॥
गान गात गात जाऊं
एकमेक साथ देउं होऽहो ॥

कठिण मार्ग आमुचा
डोंगरा कपारिचा
कामगार क्रांतिचा
मार्ग हा मुळीं असा
नाऽजुमानूं अडथळे न् बंधनें
जाऽउं आम्हीं धीट नीट रे ॥

जुल्मि राजमुगुट हे
ज्यां कुणां हवे आहे
एक एक हेरुनी
त्यास मारुं घेरुनी
घोऽषणा एक लोकशाहि घेउनी
गाऽत राहूं ऐक्यगीत रे ॥

हातिं शस्त्र घेउनी
ॲटम बॉम्ब दाउनी
मार्ग रोखती कुणी
त्यांस पाणी पाजुनी
गाऽत जाऊं क्रांतिगीत रे ॥

आम्ही ना कधीं मरूं
मरण हस्तगत करूं
शत्रुला जिते पुरूं
विजय पाहण्या उरूं
वाऽजवूं जयदुंदुभी न् चौघडे ॥
गाऽऊं एकसाथ जीतगीत रे ॥

# लुटावया जीवन भांडार

लुटावया जीवन–भांडार; द्यारे धडका फोडा दार
जीवन–वेतन आंत अडकलें
महागाईनें पुरें सडकलें
बेकारीचे लोट थडकले
पिळले तें तें सर्व भडकलें
विचार अंतीं मार्ग एक या करावया दारावर दार;
द्यारे धडका फोडा दार– १

झिर्झिरीत पडदा खादीचा
शुद्ध स्वदेशी दारावरचा
बंद घराच्या कुलुपावरचा
नवा मार्ग तो फसवणुकीचा

कडि कुलपांतून फसवणुकींतुन काय अपेक्षा फळफळणार
घ्यारे धडका फोडा दार– २

सामाज्याच्या जुन्याच भिंती
नोकरशाही जुनीच नीती
जुने अडथळे तेच रक्षिती
आम्हां खेद ना तमा न भीती
किल्ल्या हिस्कुन घ्यारे यारे एकजुटीनें करा प्रहार,
घ्यारे धडका फोडा दार– ३

एकजूट मोडाया अपुली
भाडोत्री सेना ही टपली
गर्जत रहा गर्जना आपुली
लोक क्रांतिची जगांत उठली
रणगाडे ठरतील निकामी आतां पाजळा संपहत्यार
घ्यारे धडका फोडा दार– ४

ध्येय साधण्या धडक घेऊं या
हवें रक्त तर रक्त देऊं या
गेलें तितके पुनः मिळवुं या
हवें आहे तें सर्व मिळवुं या
खूण यशाची मेढेकोटावर रक्त–ध्वजा ही फडफडणार
घ्यारे धडका फोडा दार– ५

# तांबडं फुटलं

तांबडं फुटलं ऊठ सजणे
गाडी जुपायाची एळ झाली ॥धृ०॥

बघ देवाच्या वाटेवर कुठं कुठं
सैतानी सत्तेची काटंकुटं
पायांत आतां पतुर रुतली
गाडी जुपायाची एळ झाली ॥ १ ॥

आता लावुं आग अशा कुपाटीला
बसूं थोडा येळ शेकोटीला
अशी लई झोप नाई बरं चांगली
गाडी जुपायाची एळ झाली ॥ २ ॥

अंवती भंवती झालं कुणबी जागं
आळशाला टाकून गेले म्हागं
नाचक्की व्हायची ग पाळी आली
गाडी जुपायाची एळ झाली ॥ ३ ॥

गेलि नाई एळ चल् गाडी जुपूं
क्रांती गीतं गात बैलं दापूं
दुस्मान तुडवूं ग टांचे खाली
गाडी जुपायाची एळ झाली ॥ ४ ॥

फड्फड्ला झंडा अन् वारा गोड गार
(झाली) खवूला पदर माझी रानी तयार
चला राव गाडि तुमि जुपा आपली
जोडी आघाडीला माझि चालली ॥ ५ ॥

# भलऽरी

( गाणाऱ्यांच्या दोन बाजू करून प्रत्येक बाजूनें एकेक ओळ घेऊन एकापुढें एक अशी म्हणायची. )

ए ऽ भल ऽ रि घाल तुझी भलरि घाल
हो ऽ तुझि येऊं दे साद ही देतोच साद ॥ धृ ॥

हिरवं हिरवं माझं डुलत रान
झालं पिवळं चल कापू जोमानं
कनसाच्या भारानं टाकीत मान
टाकूं खळ्यावर्ति सोन्याची बेनं
हे ऽ भलंरि घाल ॥ १ ॥

कोन आलं तिकडं हळु पावलानं
येऊं दे कुण्णीबि उडवूं गुंड्यानं
फरद्या ऽ महाद्या ऽ हो ऽ हो हो ऽ
द्यारे सारे साथ एका जोमानं
हे ऽ भलंरि घाल ॥ २ ॥

अवंदान् या पुढति अन्याय न्हाई
सावकारशाही मुळीं ठेवायचि न्हाई
कुनब्याचा बोल वाया जायाचा न्हाई
एकीचं हत्यार पाजळलं हाई
हे ऽ भलंरि घाल ॥ ३ ॥

हातातल्या जमूनी या न्हाई सोडायच्या
गेल्या जमूनी साऱ्या हिस्कून घ्यायच्या
कसनाऱ्याला साऱ्या वाटून द्यायच्या

हक्कानं सौताच्या जमुनी कसायुच्या
हे ऽ भलंरि घाल ॥ ४ ॥

एकीनं यश येतं साऱ्या कामाला
एकीनं घेऊन चला बावट्याला
शेतकरि रक्ताचा झेंडा निवडला
रक्ताला झेंडा ह्यो जागंल आपला
हे ऽ भलंरि घाल ॥ ५ ॥

# मालन कामानं सुकली

काम करून गिरणीत थकली रं
माझी मालन कामानं सुकली ॥
फाटं पिकलेलं जांभूळ ताजं
नाचे चौखूर हरिणच माझं
निस्त्या साईचं रं लोणि ताजं
ज्वानि साच्याच्या सांध्यांत टाकली रं
माझी मालन कामानं सुकली ॥ १ ॥

कोंडवाड्यांत कोंडून घेऊन
टाकला जीव रहाटानं खाऊन
काम केलं तरी मन लावून
वर्ति नायकीनीची चाले टकली रं
माझी मालन बोलानं सुकली ॥ २ ॥

" कच्चीबच्ची तुला व्हावी चार
सुखी संसार शाळेंत पोरं
पोरं न्हेत्याल कुळाला म्होरं "

समदि आशा ही धनाला विकली रं
माझी मालन भाग्याला मुकली ॥ ३ ॥

गरीबांच्या जवानिचा बळी
धन घ्या दिसा बांधून मोळी
करतो आठच घंट्यांत होळी
आतां पायवाट ह्यांतून निघली ग
आमा आजवर होती जी चुकली ॥ ४ ॥

गेलं मैदान लोकांनि फुलून
लोक गेल्यात एकीवर भुलून
एका सुरांत गात्यात खुलून्
क्रांति तुतारी लोकांनि फुकली रं
आतां खुलंल कळी ही सुकली ॥ ५ ॥

चल मिळून मैदानि जाऊ ये,
झेंडा सुखाचा मैदानि पाहु ये
गाणि मिळून क्रांतिची गाऊं ये
आलि ज्वानि हंसत ही आपली ग
आणि खुलली कळी बघ सुकली ॥ ६ ॥

# छाती असंल तर या

सुटला धोटा साच्यावरून । साच्या बंद करून । धोटं समदं घेऊन ।
रस्त्यांत आला । लढा लढायला । त्या आडवायला ।
छाती असंल तर या ॥धृ०॥

कॉंग्रेस सरकार धन्याची जात ।
ऐटींत घालून हातांत हात ।
मधून येती कराया घात ।
सत्तेची बंदूक न्हेमीची बात ।
मनं "देऊं ती भाकरी । पडंल ती चाकरी । न्हाईतर ठोकरी ।"
माराया येताय का या । सुटला धोटा ॥ १ ॥

त्वेषानं चिडून आलों रनांत ।
निसतीच भाकरी नाहीं मनांत ।
कारभार समदा घ्यावा हातांत ।
धनीकशाहीचं पाडून दांत ।
तूर्ताला ठरलं । हत्यार धरलं । रनी उतरलं ।
आडवाय् येनारं या । सुटला धोटा... ॥ २ ॥

धोटा, बॉबिन, बांबू, रहाट ।
खांद्याला खांदा हातांत हात ।
मैदानि आलों एक्या दमांत ।
माघार नाहीं एकच बात ।
बाता झोडायला । एकी तोडायला । गोळ्या झाडायला ।
छाती असंल तर या । सुटला धोटा ॥ ३ ॥

# पुढं चला--

( गटानें नाचून म्हणायचें गाणें )

पुढं चला पाय उचला पाऊल पुढचं पुढंच ऱ्हायचं–
वळुन्बि बगायूचं नायरं ठरलं–पुढं चला ॥धृ०॥

आजवर वाहिलं रक्ताचं पाट । शत्रूचं दांत । घालुन घशांत ।
गड्या शाब्बासरं
काळ्याकुट्यांतून काढून वाट । अंधार दाट । चढून घाट ।
आला वर, खरं
येशीवर आला, शेवटचा हल्ला, करायूचा ठरला
इचार दुसरा नायरं–ठरलं–पुढं चला... ॥ १ ॥

रोग साऱ्या गांवाचा हेरलेला हाय ! घेरलेला हाय ।
पन् धरायुचा हाय । काय खरं का नाय ?
कालच चेचला गोऱ्याचा पाय । त्याला लपायू । यानं जागा दिलायू ।
खरंच हायू मर्दा
जिथं जिथं दिसूला, दिसला कि खेंचला रस्ता ह्यो आपला
साधान् सीधाच हाय हां–ठरलं–पुढं चला ॥ २ ॥

मजूर शेतकरि सरा म्होरं । गिरनीवरं । कुणि शेतावर
मोर्चा धरा राव—
नाकीं नाकीं सारि रोकुन धरा । तय्यार व्हा । बिगिन् करा
गमू नका एळ
गनीमि कावा, तुमाला ठावा, प्रसंगि दावा
एळकाळ दवडायचा नायरं-ठरलं–पुढं चला ॥ ३ ॥

पिळ्ले गेले सारे साथीला घ्या । कंत्रा कसा । इसरूं नका
एकीनं या राव
राज्याचा कारभार हातांत घ्या, शत्रू बघा । हुस्कून द्या
जल्दी करा राव-
गुंडांचा ताफा, निस्त्याच वाफा, तोंडाच्या तोफा
डागून भागायचं नायरं, ठरलं-पुढं चला... ॥ ४ ॥

## उठली पुन्हां जनता

उठली पुन्हा जनता या जगता बदलाया
बदलाया उठली पुन्हा जनता ॥
हें पहा पेटले रान, हिमालय भारत आपुला
राखाया ॥ उठली ॥
येऊं द्या संकटसेना परि नाहि कुणी डरणार इथें
रे नाहिं कुणी डरणार इथें
शान भारताची राखाया प्राणपणें लढणार इथें
रे प्राणपणानें लढणार इथें
गौरवशाली इतिहासाला नवरंगानें नटवूं या
नवरंगानें नटवूं या ॥ उठली ॥

समाजवादी ऐक्य उभारा निर्वाणीची हांक तुम्हा
रे निर्वाणीची हांक तुम्हां
जगति एकता अजिंक्य शक्ती ढाल तशी तलवार तुम्हां
रे ढाल तशी तलवार तुम्हां
तुम्हीं करा ऐक्य मग समर्थ आहे ऐक्य शत्रुला ठेचाया।

# बर्फ पेटला

बर्फ पेटला हिमालयाला विझवायाला चला,
वृद्ध तरुण या फक्त रक्त द्या, द्या रे साद हांकेला
यारे द्या रे साद हांकेला ॥

घडूं नये तें अजला घडतें
स्वातंत्र्याचें बाळ रांगतें
स्वतंत्र विहरावया धांवतें
बंधू चीनी सुरा घेऊनी काळ होउनी आला ॥

रक्ताचें खत मिळतां थोडें
सीमेवरची झुडपें झाडें
देशरक्षणा बनतिल वेडे
तृणपर्णांना मिळेल शक्ती–तेच रोखतिल हल्ला ॥

रक्तकलश हिमगिरीवर चढुं द्या
जनसागर सीमेला भिडुं द्या
शिरकमलें अग्नींत पडूं द्या
ध्वज राष्ट्राचा सीमेवरचा भिडुं द्या रे गगनाला ॥

पक्ष पंथ धर्म भेद सारुनि
गिळिली भूमी मुक्त करोनी
गान शांतिचें घुमवूं गगनी
न्यायी भारत नाहिं आक्रमक दावूं या जगताला ॥

# यारे ऽ यारे ऽ

शेतकऱ्यांनों यारे, घ्या एकीची हातीं मशाल
कामगार या सारे उधळा वरती रक्त गुलाल
तुम्हीं उभारून जग हें अवघें, ऱ्हावयाला घरटें–न मिळे
तुम्हीं पुरवतां अन्न–वस्त्र परि, तुम्हांस नाहीं पुरतें कधिंही
तुम्हीं काढिले कष्ट, पोसले दुष्ट न्याय कुठलारे ? यारे यारे ॥ १ ॥

पोसलींत कां बांडगुळें हीं, लाथा खाण्यासाठीं–केवळ
नाहीं हो जगण्यांत राम, रडगाणें गाण्यासाठीं–हें रडगाणें
आज उठा उंचाउनि माना नवीन गाना गारे–यारे यारे ॥ २ ॥

दुनियेमधली फौज आमुची, मजूर शेतकऱ्यांची–सजली
उतरलिही मैदानि ना कुणा, छाती अडवायाची–ना कुणा
हातांत घालुनि हात मिसळुनी त्यांत जाउंया यारे–यारे यारे ॥ ३ ॥

जगामधिल पिळले जाणारे, सर्व साथिला घेऊं यारे
शक्ति आघाडीवर लढणाऱ्या, हांक तयांना देऊं–एकिची
माणुसकीनें जगण्यासाठीं लढून विजयी व्हारे–यारे यारे ॥ ४ ॥

# दर्यावर तुफान झालं

दर्यावर तुफान आलं वर आभाळ काळं झालं
अन् पिसाटला वारा । यम बडवित बसे नगारा
गांठूं पैलतिरा, गांठूं पैलतिरा ॥

बघ भवऱ्याकडं नाव निघाली बचली बचली
सांभाळ राया धारंत घुसली । कंबर कसली
यारे ऽ ऽ रात्र अंधारी चुकवूं यम दरबारा
गांठूं पैलतीरा, गांठूं पैलतीरा ॥

हाती सुकाणूं ताठ शीड मग भीति कसली
प्रयत्न आपुले यमराजाला धडकी बसली
यारे ऽ ऽ समाजवादी दीप दिसे तो न्यारा ।
गांठूं पैलतीरा, गांठूं पैलतीरा ॥

फुटे पहांटेचा मंगल तारा पसरि पिसारा ।
पैलथडीहुन सुगंध आणी । पहांट वारा
यारे ऽ ऽ आई मराठी देई कूस उबारा ।
गांठूं पैलतीरा, गांठूं पैलतिरा ॥

## जागा राहा

रात्र आहे वैऱ्याची जागा राहा—जागा राहा
काल लाल किल्ल्यावर आपुला
तूं रोविला तिरंगा
हुतात्म्यांनिशी झुंज दिली रक्ताची वाहुनि गंगा
तो जाळाया चीन पेटवी आज सीमेवर दंगा
संघराज्य धोक्यांत आहे रे—तुझी दिल्लिची गुहा ॥

झेंड्याची काठी पोखरण्या
घुसले कांहीं किडे
विजयध्वजा गगनांत डौलतां
तळमळुनी तडफडे
पिसाळले सूर्याजी तेही
संधि शोधण्या खडे
अब्रू लागली पणास जनताजनार्दना तूं पहा ॥

कंसानेंहि कपट योजिलें
कृष्णा जन्मण्या आधीं
गजाआड देवकी उपाशी
पिलांसवें आनंदी
नेपाळी पुतना नरकासुर
आयुब मोका साधी
नवस्वतंत्रता कृष्ण मारण्या शत्रू सजला पहा ॥
जागुनि न्यायी परंपरेला
घेर अचुक शत्रूला
कोटि हातांची मूठ बांधुनी
काढ झोडपुन त्याला
स्वैर लहरूं दे ध्वजा दिल्लीवर
साद घाल नेहरूला
संघराज्य जनशक्ति पाठिशी तुझ्या उभी ही पहा ॥

## ज्यानि आम्हा गरिबास्नि नाडलं–

ज्यानि आम्हां गरिबास्नि नाडलं हो
त्यांच्या तिजोरीला भोंक पाडलं ॥ धृ० ।
होतो सारं कामगार शेतकरि चिडलं
आणि साऱ्या गोऱ्यास्नि काल आमि झोडलं
आज सारं देशी तिजोरींत दडलं
त्यांचं राखन करीत बसलि दोंद भरीत
आयत्या बिळातलं म्हांडूळ ताडलं हो–
त्यांच्या तिजोरीला भोंक पाडलं ॥ १ ॥

भाऊ मनून आजवर पोसलं
मस्त खाऊन बोकांडि बसलं
दात खायाचं आमाला दिसलं
जाग येता खिनी बुरुस घेऊनि झनी
यांचं थोबाड रंगवून काढलं हो–
यांच्या तिजोरीला भोंक पाडलं ॥ २ ॥

थोडं कड्ड इंद्रावन घेतलं
अन् साखच्या पाकांत घातलं
गूण सोडिल का सांगा ते आपलं ?
दिली खुर्ची आमी एळ एता नामी
घरधन्याला खुर्चीनं पिडलं हो–
यांच्या तिजोरीला भोंक पाडलं ॥ ३ ॥

खुर्चि जोडायची आमाला ठावं
खालि कशि ओढायची ते पण ठावं
तोडजोड आमा लोकांलाच ठावं
पांढरपेशा, विद्यार्थी, किसान, कामगार
खुर्चीला घेऊन भिडलं हो–
यांच्या खुर्चीला भोंक पाडलं ॥ ४ ॥

आमिं ऐनीचं कामगार गडी
ठरलं एकदां कि टाकलिच उडी
आमी लढायला समुद्याच्या पुढीं
झालं खुल्लं मैदान, केलं जीवाचं रान्
आता आखरीचं गिरमीट काढलं हो
त्यांच्या तिजोरीला भोंक पाडलं ॥ ५ ॥

नाहीं मागून मिळत काई
सारं कळून गेलेलं हाई
घेऊं एकीनं सोडायूचं न्हाई
मोठ्ठे गेले वहात झिंझुर्ऱ्यांची ही जात
समूदं धारंला आणून सोडलं हो
त्यांच्या तिजोरीला भोंक पाडलं. ॥ ६ ॥

# जात्यावरच्या ओव्या

रक्तानं ग रंगलेला । लालबावटा
सुपामंदी न्हाई दाणा ।
उपाशीच माझा कान्हा ।
राबतोय रानीं राणा
उपाशाचि आठवण माझी । लाल बावटा ॥ १ ॥
रघु माझा शाळा जाई ।
अंगात गं अंगडं न्हाई ।
अंगाचि गं होते ल्हाई ।
अंतरिची हांक देतां । आला बावटा ॥ २ ॥
धनिकांची सत्ता सगळी ।
रीत तिची दुनिये अगळी ।
जिवं माणसास्नी चघळी ।
उलूथवील सत्ता असली । लाल बावटा ॥ ३ ॥
उठा बाई फाट झाली ।
साद कोंबड्याचि आली ।
सूर्यानं गं आणली लाली ।
त्योबि मनूतो घ्यागं हाती । लाल बावटा ॥ ४ ।

शेतकऱ्यांच्या पोरी उटल्या ।
मुंबईंत काई गेल्या ।
गिर्नि मंदी राबुन् मेल्या ।
आखरि पोटासाठीं घेती । लाल बावटा ॥ ५ ॥

धनिक आणि सरकाराचा ।
इचार एक झाला त्यांचा ।
गरीबास्नि चोपायाचा ।
शेतकरणिं घ्या गं हातीं । लाल बावटा ॥ ६ ॥

आता जुलूम न्हाई ठावं ।
उपाशी पन् कां गं न्हावं ? ।
बोलुनिया कां गं घ्यावं ? ।
वाघिनिची शिकवण देतो । लाल बावटा ॥ ७ ॥

राह्यलं काय् जाइल आता ? ।
खंत कशाला बाळगतां ? ।
एकिचा जर हात देतां
रणीं तुम्हांसाठीं जाइल । लाल बावटा ॥ ८ ॥

मनूचि खोटी आशा सोडा ।
एकीचा घ्या हातीं घोडा ।
जुल्मि शिरीमंतास्नी झोडा ।
घोड्यावरति मिरवा आपला । लाल बावटा ॥ ९ ॥

अनुक्रम ६५०२५ वि: काव्य
क्रमांक / २०१२ नोंद दि २.६.५१५९



# जात्यावरची ओवी

पैली ओवि गाते । लाल बावट्याला
पुढारि जो झाला । आम्हासाठीं ॥१॥
सुगीचं पीक । तसा झेंडा लाल
गरीबांचं हाल । नाहीं आतां ॥२॥
हातांत हासूड । गाडीत बसून
राणि गाते कोण । लाल झेंडा ? ॥३॥
खुळखू वाजते । बैलाची चंगाळी
साथ कां निराळी । हवी त्याला ? ॥४॥
गागं गा बायानूं । लाल बावट्याला
देतो ओ हांकेला । झेंडा लाल ॥५॥
पिंजला कापूस । आकाशी पसरीला
तारा वर्ती आला । मंगळाचा लाल ॥६॥
वारा ऊसाऊन । झेंपा घेत गेला
लाल बावट्याला । झोंका द्याया ॥७॥
लाल बावट्याला । झोंका देतो वारा
ऊंस मळा सारा । नाचे डोले ॥८॥
झोके देत वारा । गाती रानोमाळ
गाई दारीं बाळ । झेंडा गीत ॥९॥
जवानींत आला । माझा झेंडा लाल
क्रांतीचा गुलाल । उधळीत ॥१०॥
माझ्या दाराऊन । गेला कोण बाई ?
हातीं झेंडा घेई । त्योबि लाल ॥११॥
किल्बिलाट न्हाई बाई । जय हा झेंड्याचा
लाल बावट्याचा । पक्षि जय गाती ॥१२॥
लढाईचा खेळ । रंगांत गं आला
यश बावट्याला । खुणवीत ॥१३॥

७४०१

# शाहिरास

सिंह गर्जना ठोक शाहिरा–गाऊं लाग बिनधोक ॥
ऐक्य–सूर्य ही मशाल घेउनी
तव रक्तानें तेवत ठेवुनी
वेग विजेचा पायां देउनी
जुन्या जगाला टाक जाळुनी
तुझ्या गर्जनेनेंच उठूं दे, हादरून सारा लोक ॥१॥

कवन अपुलें स्वैर गायचे
पैशावारी ना विकायचे
मोकाटपणीं गात राह्यचे
आपुन कलेचे सेवक सच्चे
आडवायाला येतील जीं जीं तीं बंधनें रोक ॥२॥

डोक्यावर्ती लाठ्या पडल्या
संगिनी बरच्या जरी रोखल्या
रक्ताच्या चिळकांड्या उडल्या
नरदेहाच्या चिंधड्या झाल्या
जिभेवरी परि तान कलेची, घेउं लाग बिनधोक ॥३॥

घसा बसूं दे गाऊन गाऊन
आंतडि येउं दे गळ्यांत गाऊन
पडूं नको परि थकून जाऊन
कलावंत तूं डोळे रोखून
टाक जगांतिल जुलुम जाळुनि-आग आंसुतून ओक ॥४॥

कला वाणि तुझी हय मर्दानी
गेला जरि तूं जगा सोडुनी
घुसलि तान तुझि ज्यांच्या कानीं
मेले उठतील वारा पिउनी
झाड पाड पन काढत्याल बघ, तुझ्या सुराचा झोंक ॥५॥

नको तरी तूं आज एक कर्
रक्त वाहुं दे सळ सळ सर् सर्
आवाज उठूं दे त्याचा भयंकर
तोच कलेचा शत्रू सोडिल अपसुक हा भूलोक ॥६॥

कलावंत पॅरिसचा उठला
मतभेदां सारून बाजुला
हजारोंनीं एक जाहला
कामगार शेतकरी साथिला
भांड्वलवाले पुर्ते गाडले कामगिरी पण चोख ॥७॥

एक माणसां रोग जाहला
साम्राज्याचे पोक तयाला
भांड्वलशाही गोळा उठला
मजुर शेतकरी तो पण पिडला
रोगमुक्त माणसां करोनी निशा कलेची झोक ॥८॥

# एकीचं रुमणं

मनगट दनगट छातींत हिंमत
हातांत रुमणं एकीचं-धरारं-करारं-
शेता माळावर बांधा बांधावर,
कडं एकीचं करारं- ॥धृ.॥

दऱ्याकपारीन् डोंगर माथा हालवुन सोडा
घ्यारं घ्यारं हातिं एकीचा घोडा
म्हराष्ट्यामधला ठाकूर, कोळी, भिल्लं न् आगरी-
एकीत जोडा.
घ्यारं घ्यारं हातिं एकीचा घोडा
रक्ताच्या ताज्या वारलि राजा-
वक्त आला बरारं-धरारं-करारं. ॥१॥

भेदरट, भोळसट, कुनब्ट नावं
घाटी, राम्या, कुनी बाळू मनावं
ओरबाडं काडत्यात घालत्यात घावं
जल्माला मावळा आला आमांतून-
दावाया पुढती सरारं-धरारं-करारं ॥२॥

महार मांगाची कढवी जमात
देईल आपल्याच हातांत हात
म्हराटि मुस्लिम देईल साथ
म्हराष्ट्यामधला कामगार शेतकरि
एकीत येऊ द्या पुरा रं-करा रं ॥३॥

कॉंग्रेस सरकार निवडून दिलं, करील भलं-
होतं वाटलं.

भरमाचं भोपळं फुटून गेलं
वस्त्र न अंगांत, अन्न ना पोटांत, कालचा दिवस बरा
वाटू लागलं.
धंदे सारे पार बसून गेलं.
धंदा शेती न्हाई, रोजंदारीपायीं
मेटाकुटी जीव आलारं–धरारं–करारं ॥४॥

मारवाडि, गुजरानि खनु खनुं काढलं
साऱ्या म्हराष्ट्रात भगदाड पाड्लं
ह्याच घुशी म्हागं गोरे बि दड्लं
मराठ्याच्या पोरा, उभा राही मर्दा
उडवाय खुर्दा पुरारं ॥५॥

---

टीप—या गीतांतील कुठलाहि शब्द जाती, धर्मवाचक नाहीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

# चले जाव

चले जाव माजोरी ऐतखाउ उन्मत्त पशूंनों जाव
गोरे काळे सगळे बगळे जाव जाव चले जाव ॥
धनवानांची असुरी सत्ता
त्यांत आजवर खाउनि लाथा
किती तरि मेले नाहीं सत्ता
दुःख जुलुम हें सहता सहता
अमर्याद या सहनशक्तिला नाहि यापुढें वाव ॥ चले जाव॥

ऊत लांचलुचपतीला आला
काळ्या बाजारानं जीव घेतला
माणुसकीला धनीक मुकला
पैसा खोऱ्यांनी जमवीला
बदमाशानों जप्त करून इस्टेटि उतरवु भाव ॥ चले जाव ॥

कामगार मैदानीं आला
शेतकरी त्याच्या साथीला
जो जो पिळला तो तो उठला
लढा क्रांतिचा पुढें न्यायला
बेकीचें आम्हीं कवच फोडलें, बऱ्या बोल चलेजाव ॥ चले जाव ॥

स्थापाया लोकशाही सत्ता
सुखि जन सारा सगळि सुबत्ता
स्वयंनिर्णयें निर्मु एकता
ध्येय गांठण्या समाजसत्ता
दिसेल त्या त्या जागीं घालू धनिकशाहीवर घाव ॥ चले जाव ॥

हाच एक आम्हि मंत्र घेउनी
उतरलोंत या रण मैदानीं
भांडवलशाही शक्ति जाणुनी
लोक क्रांतिस्तव चंग बांधुनी
जनताद्रोही पकडुन सगळे बुडवुं तयांची नाव ॥ चले जाव ॥

एक सांगतों शेवट ऐका
घुबडांनो हा तुमचा धोका
गोरा असो वा काळा बोका
वादळांत फुटलेली नौका
वेळ संपली घटका भरली आला एकीचा घाव
काळें करा आतां व्हा चालते जाव जाव चले जाव ॥ चले जाव ॥

# तडजोड न्हायरं तडजोड न्हाय

मराठ मोळा, जमून सगळा, गर्जे तो अगळा ।
तडजोड् न्हायरं तडजोड न्हाय–तडजोड ॥
स्वातंत्र्य आमुचें, नव–नवसाचें, स्वातंत्र्याला जगिं तडजोड न्हाई ॥
पातिव्रत्य जें जगीं मोलाचें, जगामध्यें त्याला ॥ तडजोड न्हाई ॥
स्वाभिमान नीति अगळी त्याची महति, नीति स्वाभिमाना
तडजोड न्हाई ॥

संयुक्त महाराष्ट्र कारवार बेळगांव स्पष्ट, मुंबईच्या बाब्तितची
तडजोड न्हाई
तीन कोटी जन महाराष्ट्रीय मन आमाला डावलून चालायचं न्हाई
न्यायाला गाडून, महाराष्ट्रा फाडून टाकणारं जल्माला आलंच न्हाई
वाघाचा सिंहाचा, एकत्र बांधायचा, डोंबारि खेळ आतां
चालाय्चा न्हाई, तडजोड न्हाईरं ॥

संभाजीच्या म्हागं संकट झालं जागं, संकटावर मात केलेली हाय
वेळ आली तर बाय्का–पोरं सारं म्हातारं बी म्हागं न्हानारं न्हाई
शमी झाडावरली, शस्त्रं लपवलेली बाहेर आल्याविणा न्हायाची न्हाई
ज्यासाठीं जगायचं, ज्यासाठीं मराय्चं, संयुक्त महाराष्ट्रा पर्याय न्हाई
तडजोड न्हाई ॥

महाराष्ट्र लुटारू, म्हणती पोटभरू, लुटालुट आम्हां कराय्ची न्हाई
जनतेला लुटायचं, धोरन म्हराठ्याचं नव्हतं तें यापुढं न्हानार बी न्हाई।
मेलों आम्हीं जर, भूत होऊं पर, भांडवलशाही गाडूं सोडायचं न्हाई
अगर हम बचेंगे, फिरभी लढेंगे बाणा, मराठी हा चुकायचा न्हाई
तडजोड न्हाईरं ॥

# शेषस्तवन

(भजन)

जनरूपी भुजंगनाथा तूं जाग आतां रे जाग आतां
हे शेषशायि भगवंता तूं जाग आतां रे जाग आतां
नव्या युगाचा नवा मदारी
आलों दारिं मी बनुन भिकारी
शेषशायि तू तुझ्या फणावर
पेललीस ही दुनिया सारी
तुझ्या श्रमाची फिकिर कुणाला
दैत्य मारिती लाथा–तूं जाग आतां रे जाग आतां
जननिष्ठेची नवीन पुंगी
आळवितों मी तुझ्याच दारीं
किती दिवस पडशिल पाताळीं
आर्त हांक ऐकरे मुरारी
तुजसह तव भक्तांची त्रेधा
आज उडाली नाथा तूं जाग आतां रे जाग आतां
तूंच पेललेल्या धरतीवर
खेळ चालले प्रलयंकारी
ॲटम हैड्रोजन बाँब उडविती
कांहिं चोर लुच्चे व्यापारी
पर्वा नाहीं तूं मेला तरि
सांगूं काय अनंता–तूं जाग आतां रे जाग आतां
"जगही जळुं दे शेष मरूं दे
नफा आमुचा आम्हास उरुं दे
आई मुलें मरुं देत उपाशी
तोंड फक्त माझेंच भरूं दे"
या वृत्तीचे असुर नवे हे
गाड सख्या जगधाता तूं जाग आतां रे जाग आतां

# गोवा गीत

स्वातंत्र्याच्या भाजीभाकरित सांपडती रे अजुनी खडे ।
वेंचुनि काढा मत्त पोर्तुगिज मुळासकट अन् चला पुढें ।
व्हारे पुढे चला पुढें ॥ धृ० ॥

एक भारतीय जोंवर राहिल गुलामगिरीच्या बंधांत ।
तोंवर कुठला घास सुखाचा ? कोण असे आनंदांत ? ।
फिरंगी साम्राज्याचे मिळवूं धुळीस उरले कोट-खडे ।
वेंचुनि काढा मत्त पोर्तुगिज मुळासकट अन् चला पुढें ॥ धृ० ॥

दख्खनचे नंदनवन अमुचें खाण दुजी सौंदर्याची
ताडमाड दुधसागर शोभा निळ्या मनोहर दर्याची ।
अमुचे अंगण आम्हांस बंधन न्याय अजब दृष्टीस पडे ।
वेंचुनि काढा मत्त पोर्तुगिज मुळासकट अन् चला पुढें ॥ धृ० ॥

तसूभरहि धरतीवर अमुच्या हक्क कुणी जर सांगेल ।
शत्रू ठरुनी मोल जिवाचे तयास द्यावे लागेल ।
अमुची धरती फक्त मागते शत्रूचें गाडण्या मढें
वेंचुनि काढा मत्त पोर्तुगिज मुळासकट अन् चला पुढें ॥ धृ० ॥

पक्ष-पंथ धर्म भेद सारे आम्ही झटकुन टाकीयले ।
हेरुनि शत्रू मत्त पोर्तुगिज पाणीहि त्यांचे जोखीयले ।
यश हे आपुल्या पायाखाली उठा चला रे गोव्याकडे ।
वेंचुनि काढा मत्त पोर्तुगिज मुळासकट अन् चला पुढें ॥ धृ० ॥

# कॉंग्रेसबैलाला मत कसं द्यायचं ?

सामान्यजन–कॉंग्रेसच्या बैलाला मत द्या मनता
बैलाला मत कसं द्यायचं ?
बैलाला मत देउन् काय आम्हीं
बैलोबा म्हणवुन घ्यायचं ?
कॉंग्रेसवाला–हज्जार योजना आंखल्या तुम्हासाठीं
योजनांना हाति तुम्हि घ्याय्चं
सामान्यजन–योज्नानि माजल्यात काळाबाजारवालं
त्यांचंच उखळ पांढ्रं व्हायचं ॥ कॉंग्रेसच्या ॥

कॉंग्रेसवाला–धरणंच धरणं बांधलीं देशामधी
पाणी कुठं त्याचं जायचं ( सांगा )
सामान्यजन–आजवर गेल्य ते भांडवलवाल्या घरीं
तसंच यापुढं जायचं ॥ कॉंग्रेसच्या ॥

कॉंग्रेसवाला–श्रीमंत गरीब दोघंत्रि सारखंच
न्यायानं राज्य करायचं. ( आम्हांला )
सामान्यजन–धनिकाला मलिदान् गरिबाला धत्तुरा
खासाच न्याय मनायचं–( तुमचा ) ॥ कॉंग्रेस ॥

कॉंग्रेसवाला–लोकशाहीसाठीं लोकांचेसाठीं
राज्य हें आमा हांकायचं
सामान्यजन–निवडुन येताच लोकांवर गोळिबार
दस्त्यानं वर झोडपाय्चं ॥ कॉंग्रेस ॥

कॉंग्रेसवाला–देशांत वाढलं गुंडांचं रान तर
आभि का न्हाई छाटायचं ( सांगा ) ?
सामान्यजन–जनता का मराठी समदीच उफराटी
गुंड तिला मानाय्चं–( काय हो )

कॉंग्रेसवाला–कायदा व्यवस्थेचं शिस्तिचं कॉंग्रेसचं
राज्य हें आम्हा हांकायचं
सामान्यजन–कायदा व्यवस्था नि शिस्तिच्या नांवानं
इंग्रजाला लाजवायूचं (काय हो)
॥ कॉंग्रेसच्या ॥

कॉंग्रेसवाला–शिस्तवाले देशभक्त आम्ही काय
शिस्तीला न्हाई मानायूचं ? (सांगा)
सामान्यजन–देशापेक्षां नेहरू मोठे सांगुन
साऱ्या महाराष्ट्राला लाथाडायूचं ? काय हो ?
॥ कॉंग्रेसच्या ॥

कॉंग्रेसवाला–देशभक्त आम्हां कॉंग्रेसवाल्यांना
बैलोबा म्हुन हिणवायूचं ?
सामान्यजन–होलो हो देणाऱ्या अस्सल पोळाला
बैलोबा न्हाइ का मनायूचं ? काय हो
॥ कॉंग्रेसच्या बैलाला ॥

# भले बहाद्दर कॉंग्रेसवाले

भले बहाद्दर कॉंग्रेसवालं सौराज्य आण्लंय् मिळवून भलेबहाद्दर
पन् सौराज्य मंजी काय् ते थोडा तरि अर्थ सांगा तुमि जुळवून ॥
भले बहाद्दर ॥ धृ ॥

सौराज्य मंजी रत्नहार कां आनूला हिमतीनं चोरून
घातला मंत्र्यानं गळयांत कि जावं आमी त्यांच्यावर भारून
सौराज्य आनलंयू सांगताय् तुमि राव हमीशा मुरके मारून
भोळी भावडी जनता जगंल कां तुकडे थापांचे चारून
भाकरि मागतां, ढीग–योजना पटकन देताय् दावून
भले बहाद्दर ॥

ती येते योजना डुलत डुलत सावकाश मुंगिच्या चालीनं
आली तर येते आठ वर्सांनीं घर कागदावर घेऊन
पर कायदा मनला कीं हां हां म्हणता येतो वाघागत धावून
धरतो नरडं अन् रानारानातु पडतो वाघागत होऊन
कायदा कसला त्यो सुरी इलायती बसला धार तिला लावून
भले बहाद्दर ॥

आमच्या रक्तांतुन आमच्या देशांतुन उभा करून सारा पैका
लुटालूट दीडशे वर्सांची कांहीं तरी गोऱ्यानिं ठेवलंय् का ?
लूट गरिबांची, ते भामटयाचं भांडवल जप्त केल्याविणा ऱ्हावंका
सौराज्य वाल्यानीं त्याच भामटया खिशांत बसुन मिरवावं का ?
पांढऱ्या पायाच्या बयेशि बसलाय् लग्न राव तुमि जुळवून
भले बहाद्दर ॥

ही पांढऱ्या पायाची बया आली थेट देशि पेहरावा चढवून
काळ्या बाजाराचा बावा सजविला शुद्ध खादिनं मडवून
उपासमारी, बेकारी, महागाई, बालकें हाळजून
मारलि जनतेच्या माथीं जनतेला आलंय् अलीकडं उमगून
जनता लागली ओरडाया तर तिलाच काढताय् बडवून
भले बहाद्दर ॥

अहो सौराज्य मंजी पोटभर भाकरी आंगभर कपडा आसरा छान
सौराज्य मंजी प्रचार करायूचा, मतं मांडायाचा मिळतो मान
तुमच्या सौराज्यांत सत्य सांगावं तर गचकन् धरली जाते मान
तुमच्या सौराज्यांत वशिलेबाजी लाचलुचपतीची घाणच घाण
सौराज्य म्हणुनी आला जनतेलाच टांग मारायचं ठरवून
भले बहाद्दर ॥

जिनं ठरवलं टांग इंग्रजाला मारायाचि ती ही जनता
दांडा कुऱ्हाडीचा झाला गोताला काळ म्हणुन ती टरकल कां ?
येऊ द्या निवडणुक त्यांत तुम्हां ती हात दावल्याविना ऱ्हाईल का ?
लाठीमाराला गोळिबाराला हार कधीं ती जाइल का ?
भरले दिवस आता तुमचे रहा तुम्ही खूप ध्यानि हें उमजून
भले बहाद्दर ॥

# लावणी

## ( अमर शेख )

[ दिवाणखान्यांत नर्तिका नाचत असते. भोंवतीं शेठ, सट्टेवाले, जुगारी दरोडेखोर, मवाली बसले असून दारांत एक मराठा माणूस लांबून गाणीं, नाच बघत उभा असतो, त्याच्याकडे पाहून नर्तिका गाणं म्हणत नाचत असते ]

माझ्यावर्ति ठेवा भरंवसा । आंत या बसा ।
रुसवा असा करूं नका ग बाई
अग बाई करूं नका ग बाई
नाईंतर टाकीन मी बि फांसा ।
रातच्या एळी जसा
[ शेठजीकडे बघून ] टाकत्याति हे तसा ।

एकजण—कसा कसा ?

नर्तिका—सांगत मी हो न्हाई अग बाई ।
सांगत मी हो न्हाई ।

एकजण—[ नोट तिला देऊन ] सांगा सांगाच—

नर्तिका—( शेठजीकडे बघून )

काळ्या कुट्ट अंधारांत । गळ टाकूनी तळ्यांत ।
ही व्यापारी मानसं बसत्यात । खुसू खुसू बोलत्यात ।
काळाबाजार यांचा फांसा । बसुन मरतो बघा मासा ।
माझा राजा होतो [ गाल व अंग फुगवून वेडावीत ] असा ।

दुसरा—कसा कसा ?

नर्तिका—दावित मी हो न्हाई अग बाई ।
दावित मी हो न्हाई ।

( शेठजी डोळ्यानें खुणावून नोट पुढें करून म्हणतो )

शेठजी—कशा कशा ?

नर्तिका—( दरोडेखोराकडे बघून )

रात्रीच्या अंधारांत । चांदणं चोरट्याच्या मनांत ।
काळा बुरखा तोंडावर्त । पावलं बिचकत टाकीत
फुसका पिस्तुल पोकळ वासा ।
ह्याचा ह्यालाच बसतो ठोसा ।
ह्याचा चेहरा होतो (लांब तोंड करून वेडावून) असा ।

दरोडेखोर—अरे चल ! म्हणे पोकळ वासा ! [ नोट तिला देतो ]

नर्तिका—गंमत केली बाई अग बाई ।
गंमत केली बाई ।

दुसरा—सांगा सांगाच.

नर्तिका—आपली समद्यांची एकच जात ।
हे सट्टेवाले जुगारी बी त्यांत ।
काम करती अंधारांत ।

शेठजी—कशा कशा ?

नर्तिका—पाप पुण्याची नाहीं बात ।

तरुण—खरंय खरंय.

नर्तिका—( त्याच तरुणास ) नका हो दूर दूरची भाषा
लावून खुळ्या जिवाला आशा ।
स्वाऱ्या तुम्हीच माझ्या खाशा ।
होऊं द्या उतराई । अग बाई पडूं आतां पायीं ।
( तो तरुण हात जोडून तुम्ही लांब आहांत त्याच ब-या आहांत असें खुणावतो.)

नर्तिका—( नाचत पुनः म्हणते )
चवली पावलींत होते मी दंग ।
होते उडवीत इष्काचा रंग ।
ठावं नव्हतं मला दुजं अंग ।

[ आतां ] त्यागिली रात्र सोडली शेज । महाराष्ट्राची राखण्या लाज ।
लावणीला मी चढविला साज ।
ऐका ल्वलाई अग बाई । सांगा पुढें काई ॥

तरुण—मग मघाशीं दौलतजादा मिळवलीय ती ?

नर्तिका—ती मी माझ्या राष्ट्राच्या पायावर ठेवणार आहे.

# समाजवादी शिवछत्रपति

अर्थात

# अमर अभिलाषा

## चौक पहिला

एके रात्रि सह्यगिरी हंसला हंसताना दिसला
आनंद त्याला कसला झाला उमगेना मानवाला
रात्रीच्या गर्द अंधाराला । चिरुन सूर्योदय कसा झाला
अरबि दर्याचा चेहरा खुलला । बांधावर आम्रवृक्ष झुलला
आंब्याच्या डोलित कोयाळ दडला । सूर मंजूळ त्यानं काढला
हर्षं मयुरानं टाहो फोडला । पोपटांचा थवा गात उडला
चिमण्यानी चिवूचिवाट केला । बोध मग मानवाला झाला

(चाल) सूर्य नव्हता शिवबा जन्मले विश्व आनंदले
गाउं लागले चराचर होऊन शिवबाचे भाट
आगळा होता त्यांच्या गाण्याचा घाट
काढलि शाहिरानं त्यातुनच वाट । अमर शाहीर शिवबाचा भाट
पवाड्याचा थाट ध्यानि घ्या राजे अहो राजे जी राघुबा दाजी ॥१॥
इतिहासकार इंग्रजी मुलुखाचे पाजी केली थापेबाजी
त्यानि शिवबाला डाकू म्हटलं । इंग्रजाचं बूट ज्यानि चाटलं
त्यानि शिवबाला चोरं म्हटलं । मराठ्याला कधीं नाहि पटलं
कुभांड कशापायी रचलं गेलं ते ऐका तुम्ही राजे अहो राजेजी
राघूबा दाजी ॥

(चाल बदल) सुरतेला इंग्रजानि पहिली वखार घातली जी
तेथुनच दिल्लीवर तोफ त्यानीं रोखिली
रायगडावरुन दुर्बीण होति लागली
टप्प्यात तिच्या ही तोफ अचानक आली जी

**( चाल धावती )** तराजुच्या बसुन काट्यावर । तोफेचं नव्हत भागणारं
राज्य ती होति हाकणारं । अवघ्या ह्या भारतावर

**( चाल मिळवणी )** शिवबा हे द्रष्टे होते थोर । हेरलं त्यानिं सारं
इंग्रज हे चोर । जळवा ह्या माझ्या वंशवेलिला
मराठ्यांच्या शूर भावि पिढिला । ग्रासतिल म्हणुन चढवुं हल्ला
नाहि तुडवायचं गुजराथ्याला । तुडवायचं फक्त इंग्रजाला
तसंच मोंगली सरदाराला । हिस्का दावायचा बेत केला
मनसुबा ह्यो शिवप्रभूनि केला । मुंबईच्या घोड बंदराला
तराफा खाडित उभा केला । नवा देव मासा जन्मा आला
सुरतेच्या खाडित थेट शिरला । निस्त्या शेपटाचा तडाखा मारला
लोळविलं हो चोर इंग्रजाला । तसंच राजापूर दाभोळाला
ज्या ज्या गोऱ्यांनीं दावा मांडला । घात्ला तुरुंगांत आणि कांडला
शत्रु खरा दावला पुढच्या पिढिला । पुढच्या पिढिनं पण त्याला हेरला
कधीं दोन वर्ष इंग्रजाला । सुखाचा श्वास नाहीं लाभू दिला
गा व्हय म्हन दादा व्हय दादा रं जी रं दाजी ॥
नाहि केलि त्यानं लुटालुट । केलि एकजूट
मावळ्यांना नीट । मार्गावर ज्यानि आणिलं काल
मराठी जन हृदयाचा लाल । जिजाई पोटीं निपजला बाळ
॥ जी जी जी ॥

**( चाल )** आदि पुरुष लक्ष्मणसिंह, सजनसिंह, दिलिपसिंह, सिंहजी
महाराणा भोजाजी
देवराजजी, इंद्रसेन, शुभकृष्ण, रूपसिंह, भूमिंद्र, धापजी
बहिरट दाजीरं हे जी हे जी बहिरट जी एकाहुन एक रणगाजी
॥ जी जी ॥ वंशवेल खलाजीची, कर्णसिंह, संभाजीची,
बाबाजीच्या पोटीं आले मालोजी । मालोजी पोटि पराक्रमी
शहाजी राजे ॥ जी जी जी ॥

(चाल मिळवणी) पेरावं तेच पीक येतं जगाची रीत
नवं न्हाई त्यांत शहाजीनं पराक्रम पेरला
मराठ्यांचा भाग्योदय झाला ॥ जी जी जी ॥

## चौक दुसरा

(चाल) आडरानि आई वर बाळ सापडला जावा
चौकडून मुसळधार पाउस येऊं लागावा
सूंसाट वादळानं जीव घाबरुन जावा
कडकडून विजेनं त्यांत डोळा उघडावा
वाघुब्राच्या डर्काळ्यानि कलिजा फाटूनि जावा
वर्षाव दगडि गारांचा वर्ति सुरु व्हावा
एवढ्यांत गुहेचा आसरा त्यास्नि लाभावा
आइ बाळ मिळुन् गुहेमध्यें जीव दवडावा
अचानक डोंगराचा कडा कोसळला जावा
असा प्रसंग महाराष्ट्राच्या नशीबीं यावा जी

(चाल) अति लुटालुट जाळपोळ उडे हाःहाःकार
मराठ्याभर माजला बकासूर, केला हो कहर
अब्रुचें जिणें जगण्याला। केलं कठिण माय बहिणीला
पाणवठा बंद जाइला। गुरं, ढोरं न्हेति छावणीला
वेठिला मर्द जुंपिला
काय वर्णू मराठ्यांत कळस जुलमाचा झाला ॥ जी जी जी ॥
उन तान पाऊस आणि वारा असा खपणारा
वस्त्र ना निवारा उपाशी दिवस रात्र राबुन
शेतं पिकवितो घाम गाळून। सुगीचं शेत उभं पाहून
मराठा कुणबि जाई हरकून ॥ जी जी जी ॥

(चाल) हलती, डुलती शेती करोनी क्षणांत उध्वस्त
आदिलशाहीचा पिसाट घाली त्याभोंतीं गस्त

काल विजापुर आज दिल्लीची धडक मराठ्याला ॥
डुकरमुसंडीमुळं भरली होति धडकि मराठ्याला ॥
तळ लष्करी परकीयांचा दिसे महाराष्ट्र
उघड्या डोळ्यानिं मरण पहावे लागतसे स्पष्ट ॥
हत्ती, घोडेस्वार, स्वार सांडणी, पायदळ लष्कर
मळ्या, खळ्याची, उभ्या पिकाची वाट लावि सारं ॥
फिरंगी इंग्रज आग लावि कधिं आपुल्या गोठ्याला
दरडीचा पण मिळे न आसरा दीन मराठ्याला ॥
उरला सुरला जीव गाडला करपट्टी खाली
म्हणुन बंधुनो हर हर भेरी शिवबाची झडली ॥
( चाल ) त्यात बाजी घोरपडे । बाजी मोहिते, खंडागळे
सावंत देसाई खोपडे । सुर्वे डबीर आणि पांढरे
चोर होते सारेच्या सारे । परक्यांचे पाय् चेपणारे
स्वकियांचा घात करणारे । करणारे हो निंबाळकर,
जाधव अन् मोरे जी जी ॥
( चाल ) जाधवांची करणी लई न्यारी मामेभाऊ होति जगदेवराव ही स्वारी
राघोजी माने हाडवैरी हे सदा त्यांच्यावरी ॥
इमानाने परक्याच्या दारीं जातिवंत मराठे जगति खरकट्यावरी ॥
मुस्लिम न् फिरंगिच कांहीं
नव्हते शत्रु, होते घरिदारी ठायीं ठायीं ॥ जी जी ॥
( चाल ) चक्रव्युहाहुन फास भयंकर आम्हांभोंति होता
अभिमन्यू शोधिते मराठी मूढमति जनता ॥
चक्रव्यूह भेदुनिही येईल विजयी होवोनी
असाच दिग्विजयी अभिमन्यू देते जिजा मानी ॥
(चाल ) आला आला शिवाजी आला अरुणोदय झाला लाल जनतेला
जिजानं दिला, योग्य समयाला मराठ्यानो करा रं जयजयकार
थोर त्या आईचे उपकार । न्हाईर न्हाई तुमच्यानं न्हाई फिटणार
जी जी जी ॥

# चौक तिसरा

बाळपणची ऐकावी कथा । जिजाईसुतानं देशाची व्यथा
जाणुनि स्वतः केलं काय काय । त्याविणा नाहि झाले शिवराय
वंदिले माता, गुरूचे पाय जी जी जी ॥

( चाल ) व्यसनी शौकिन माणुस त्यांना शत्रु दुजा भासे
दिसला हलकट त्याच्या भोंवती टाकितसे फासे

( चाल ) दिसे काबाडकष्ट करणारा । त्याला बाळशिवबा देई तुरा
तो श्रमपूजन करणारा । स्वतः वागून मार्ग दावणारा
थंडि पाऊस ऊन नाहि वारा । असा घातला पालथा दरिखोरा
असो बिकट चढण उतरण । जाई बाळशिवा सपाट्यानं
वाघ सिंह श्वापदे यांची । भीती नव्हति त्याला कवणाची
गड किल्ले निरीक्षण केले । चोरवाटा मार्ग निरखिले
गोड बोलून जना मोहविले । किति शत्रु आपलेसे केले
कांहिं शत्रु होते कसलेले । त्यांना कपटजालिं पकडिले
दैवाला पंगु ठरविले । मनगट श्रेष्ठ म्हणितलें
आधि राजबिंड असलेलें । पिंड व्यायामानें कसलेले
मैदानी मर्दाच्या कला । साऱ्या लागल्या शिवबा चरणाला
साहसाची आवड त्यांना मोठी । निर्धार घेई त्यांना पाठीं

( चाल मिळवणी ) शहाजीनं पेरलं पिक आलं हिरवं गार झालं
डुलूं लागलं । जिजाईचा मळा फुलुन आला
मोत्याची कणसं लागलि त्याला । सोन्याची ताटं शिवाराला
शिवा रायगडीं होता गेला । ताटं थेट गेली रायगडाला
शोभा त्यानिं आणलि सिंहासनाला । भोसले कुलदीप सिंहासनि
रवि तळपुं लागला गा व्हय मन दादा दादा रं जी रं दाजी जी ॥

## चौक चौथा

(चाल धावती) शिवबासरजा राजा होतो । भूमिहीनां प्रेमे कवळितो
त्यांना जमिन मिळवुनी देतो । मिळवून बियाणं देतो
भू लागवडीला आणितो । माळरानीं मळा फुलवितो
महसुलाची शिस्त लावितो । झेपेल इतका कर घेतो
सावूकार जो कर चुकवितो । सक्तीनं त्याला दंडितो
जरबेंत राज्य चालवितो । परि जनतेला सुखवितो
शिवबाचे नांव जो घेतो । अन् चोऱ्या छापे घालतो
त्यासाठीं चौक्या बसवितो । यमसदनी चोर पाठवितो
सरकारी नोकर जो होतो । त्याला खुषित सदा ठेवतो
जो शूरपणा दावतो । कडं, तोडा, घोडा त्याला देतो
इनामूदारी त्याज्य ठरवितो । जमिनदारीलाही रोधितो
देवाचि धरति मानतो । ती फक्त कसणाऱ्याला देतो
गरिबांना वचन जे देतो । ते पुरेपूर पाळतो
परधर्माला वंदितो । सर्वांना न्यायि वाटतो

(चाल) नव्हति सत्ता पोलिसां हाती
लाच खायचि नव्हति हिंमत कुणाची छाती
सभा न्यायदानाच्यासाठीं । सभासद निवडले न्याय तोलुनी देती ॥
न्यायदानी ढवळा ढवळीची
काय बिशाद लागली माय व्यालि कोणाची ॥
न्यायदाते थोर छत्रपति
हा डंका बाजला झालि चोहिकडं ख्याति ॥

(चाल) काळाबाजार हा शब्दच नव्हता शिवबा समयाला
शेठ्या एखादा नाडी जनतेला मिळे फांस त्याला ॥
पुंड पाळेगार, मातले जमीनदार सावकार सारे
वाट लावितो त्या सर्वांची शिवबा परभारें ॥

जमिनी वाटून दिल्या शिवबानें कसणारांना त्या
जळवा सगळ्या नष्टच केल्या होत्या नव्हत्या त्या ॥

(चाल) पटवून स्वराज्याच्या अर्थ दिला जनतेला
मावळा मराठा सर्व घेऊन संगतीला जी जी
शिवबानं घेउन अवतार ध्वजा रोविला जी जी
धन मन प्राणाहुन प्यार आम जनतेला जी जी

(चाल) हाक घुमे मग नवीनच गगनीं नव महाराष्ट्रांत
परकी हाकला सगळे घालून पेकाटांत लाथ ॥
परकी सत्तेविरुद्ध लढणें ब्रीद मराठ्याचे
दावुं जगाला आम्हीच वारस श्रीशिवरायाचे ॥
महाराष्ट्राचा वारा, पाणी सर्व काहि न्यारे
या दावाया मर्द मराठे समधं चला या रे

(चाल) "व्हा पुढें चला पुढें व्हा पुढें चला पुढें
हाक कानि शिवबाची गगनि झडति चौघडे व्हा पुढें चला पुढें
या मराठि जनतेचे राज्य स्थापण्या पुढें व्हा पुढें चला पुढें
दिल्लि, आदिल शाहीला चारण्यास या खडे व्हा पुढें चला पुढें
आनंदे ध्वज गगनीं शिवबाचा फडफडे व्हा पुढें चला पुढें"

## चौक पांचवा

जेव्हां शिवबा सर्जा रणि आला खुल्या मैदानाला
रवी लकाकला ध्वनी "हरहर महादेव" घुमला
आदिलशाहिचा कुजका इमला
करूं या हो जमिनदोस्त सगळा हो–या हो या राजे

(चाल) दःखनचे मर्द लढणारे मराठे शूर
कांबळी, उशाला धोंडा न् भाकर कांदा आम्हां जरि प्यार
जन्मता ठावं न्हाइ आम्हां जिणं लाचार

स्वप्नींही गुलामी नाहीं सहन करणार
सच्च्या मराठ्याचं एक ब्रीद हेंच असणारं
म्हणुनींच लावुनी प्राणपणा लढणारं
हेर हेरुन जमविले असे मराठे वीर
गुरं ढोरं न्हाइ जमविली निस्ति खिल्लारं
हिंदु मुस्लिम भेद वलांडून जमविले शूर
( चाल ) सह्याद्रीनें बाहु पसरले उभारून किल्ले
जाळीखाली वाघ मावळे पाजळती भाले
गड ठाकला उभा आपुला राखण्यास शेती
उठा बंधुनो गड सत्ताविस अजुन शत्रु हातीं

( चाल ) उठ्ला अव्घा मराठा उठला बाण जणुं सुट्ला
बॉंब जणुं फुटला दगडांतही नवा जीव आला
मनसुबा आगळा त्यानं रचला। शेतकऱ्याच्या गोफणीत बसला
दुश्मनाचा माथा त्याला दिसला
थेट मेंदूत दगड घुसला हो शत्रुच्या दादा ॥ तुम्हि ऐका
( चाल ) वाऱ्यानं रंग पालटिला कोपरान् कोप्रा व्यापिला
दिलि साथ ठेंग्ण्या बहिर्जीला सारा वारा आप्ला हेर झाला
तो धाडी उडत पक्षाला पोपटाला, व्हल्या पारव्याला
कळलं हे झाडा झुडपाला चराचर लागलं कामाला
दरिखोरा आगळ्या धुंदींत नाचुं लागला जी जी ॥

( चाल ) खेळ विटीदांडू गोट्यांचा पोरांचा सुटला
ढाल तरवारिचा शत्रु धरायूचा खेळ त्यांनी थाट्ला ॥
सुगंध घेऊन पुष्प येइ तें अर्थ नवा सांगे
सुगंध दरवळुं ह्या ऐक्याचा श्री शिवप्रामागें ॥
दंवबिंदूंची कोमलताही पूर्ण लया गेली
ठिणूगि आगीची भासे अरीला गठडि त्याचि वळली ॥

अरबी दर्या बनला होता हुकुमाचा बंदा
भासे शिदाई शिवबाचा तो सच्चा अन् खंदा ॥
म्हणुन मिळवला विजदुर्गावर विजय मराठ्यानीं
ह्याच इंग्रजाचं टोपडं उडवलं पाजलं होतं पाणी ॥
तोफेमधून पण गोळा उडायचा अजब मासल्याचा
कर्दनकाळच भासे शत्रुला शिवबा भोंसल्याचा ॥

(चाल) अफझूल खानानं फुजूल बकबा केला
विजापूर दरबारीं विडा काय उचलला
त्या प्रतापगडी अभिमन्यु होता वेढिला
अभिमन्यु शिवबानं खल कौरव ओळखिला
नव्या दुर्योधनाचा कोथूळा त्यानं काढिला
शिवबानं असा सव्याज विडा धाडिला

(चाल मिळवणी) असा मोड शत्रुचा केला झेंडा उभविला
गनिमि काव्याला महाराष्ट्रांत जन्म घातला ॥ जी जी ॥
निर्वंश बाजि घोरपडा करून टाकिला
चंद्रराव मोऱ्याकडं गेला चुचकारून पाहिलं त्याला
ईर्षेला तोहि पडलेला त्याचा पुरापुरा मोड केला
बाया मुलं सोडून बाकिच्याना स्वर्ग दाविला जी जी ॥
मोऱ्यांचं नांव लावणारा नाहि कुणि उरला
बांदलांचा पुंडावा त्यानं मोडून काढिला
आणि आम जनतेचा दुवा त्यानं घेतला

(चाल) शाहिस्ता पुण्यामध्यें आला। एक लक्ष सैन्य दिमतिला
पाच सातशें हत्ति साथिला। पांच हजार उंट काफिला

(चाल) दोन हजार छकडे घोड्यांचे होते साथीला जी जी
तीन हजार छकड्यावर दारूगोळा लादला
बत्तीस कोटीचा खजिना होता पाठिला

तीन महिने लागले फौज खालीं यायाला
या अफाट फौजेचा व्यूह आगळा रचलेला
(चाल) दरोबस्त पहारा वसविला। कड्याभोवती कडा रचलेला
त्याच्या आंत खान बसलेला। सदोदित सावध असलेला
एक रात्री शिवबाचा गनिमि कावा जागला
तो शास्ता खानाच्या पाठी क्षण लागला
थय् थय् थय् थय् निस्त्या बोटावर्ति त्या नाचविला
त्याच्या चक्रव्यूहाचा चुथडा चुथडा जाहला
अभिमन्यु शिवा पुनः खुशाल सिंहगडि आला ॥
रुस्तूम जमालाचा जमाना पालटुन दिला
त्या उदयभानुचा पुरा अस्त घडविला
दिल्लीर खानाचा दिल हलवुन सोडिला
एक समय अचानक आला। शिवबा सर्जा आग्र्याला गेला
दरबारांत मान नाहि त्याला। रांग तिसरी मिळाली त्याला
तो मनी बहुत कोपला। रोकडा शब्द सोडला
शत्रुनं गराडा दिला। आग्र्याला व्यूह रचलेला
त्या मध्यें सर्जा अडकला। दिली धडक व्यूह फोडला
अभिमन्यु रायगडि अभिमानें धडकला जी जी
अतिरथी शत्रु आघाडिला
वेंचवेंचून काढिला, कुठें वेढिला, ठेचुन काढिलान्
गनिमि काव्याचा हिस्का त्याला दाविला ऐका बघा राजे ॥
(चाल) महाराष्ट्राच्या दऱ्याकपारित सिंहाचा छावा
पळता थोडि भुइ करित शत्रुला दावुन गनिमी कावां
(चाल) शिवबाचा पाहुन दळभार हादरलं विजापुर सारं
दिल्लींत भरलं कापरं पोर्तुगीज इंग्रज हे चोरं
लाल बुंद त्यांचं चेहरं पण पडलं काळंठिक्करं
देशमूख पुंड पाळेगारं मानले ते झाले गारेगारं

दावून दिलं जगताला । जन्मता आम्हा मराठ्याला
कसलि लढाई ? अरे कसलि लढाई मळ हातचा झाला
पाचविला पुजतो तलवार बरचि अन् भाला
स्वातंत्र्य राखतो देऊन प्राणाच्या मोला
जे कार्य हातिं घेउं पुरे नेउं शेवटाला
( चाल ) नवा मनसुबा मनात बांधा हे शिवबा सांगे
बेत आपुला पुरा कराया धावा त्या मागें ॥

## चौक सहावा

( चाल ) शत्रुला वागवायाचि नीति । आगूळि त्याची होती
दीप संस्कृति आजही मार्ग दावि जगतास
परस्त्री माता वाटे शिवबास । आज झाला पुरा संस्कृतिचा ऱ्हास
होईल त्यामुळेंच सत्यानास जी
( चाल ) आफझल यम सदनाला—पाठवून पुरा मोड केला
त्याचा मुलगा शोधुन काढिला जो गर्द झाडित लपलेला
भीतिमुळं गाळण् उडालेला शिवबापुढं त्याला उभा केला
भरलं होतं कापरं त्याला शिवबानं धीर त्याला दिला
' बेटा डरो मत ' बोलिला पाठिवरून हात फिरविला
पोशाख उमरावाचा दिला आणि घोडा दिला संगतिला
त्याला बहुमान देऊन, मोठ्या इज्जतीनं
विजापूर दरबारास पाठविला ॥ जी ॥
नाहीतर आजच्या दुनियेत, विसाव्या शतकात
सांगतो काय होतं
प्रश्न पुरुषाचा घ्या सोडून । शत्रू देशांतल्या स्त्रिया ओढून
आब्रूचे धिंडवडे काढून । टाकती माणूसकीच गाडून जी जी
( चाल ) एकोणीसशें त्रेपन साल । कोरियांत युद्ध सुरू झाल
अमेरिकन सैन्य तिथं आलं । उत्तर कोरियांत गेलं

नर्स बायांनाहि पकडिलं । त्यांना नागडं उघडं पण केलं
मिरवीत रस्त्यानं नेलं । नीतिशास्त्र पायिं तुडविलं

( चाल ) इतकं दूर कशाला जावं । गिरगांव चौपाटीला जावं
दादर, पुण्यांत थोडं भटकावं । शाळा, कॉलेजांभवति हिंडावं
डोळं सताड उघडं ठेवावं । कानावरचं झाकण काढावं
गल्लोगल्लीं आणि दारोदारीं, माय बहिणीवरी
प्रसंग येतीं ते, आज तुम्ही उघड्या डोळ्यानीं पहावं जी ॥

( चाल ) परकी स्त्री मानी माता । असा शिवबा सर्जा होता जी हा जी
दिला त्रास कुणी बाईला । बांबूने झोडपून ठार करितसे त्याला जी
आई मुलगी केशर सिंगाची । धारातीर्थी पडलेल्या आपल्या
एका शत्रुची जी
वागणूक देऊन मानाची । पाठविले दिल्लीला सेवा करुनी त्यांची जी
कल्याणच्या सुभेदाराची । सून आई मानली साची जी
तिला चोळि बांगडी केली । सौंदर्यपुतळि गहिंवरून सासरी गेली जी
कर्नाटक प्रांति राणीला । शिवबाच्या सरदारानं त्रास
दिला तो कळला जी
देहांत शासन दिलं त्याला । दुर्गंध नरकाची सजा फर्माविली
त्याला जी

## चौक सातवा

( चाल ) संस्कृति नीतिसाठी खरा मार्ग दावाया
घ्या समोर आजहि छत्रपती शिवराया
आरमार पूर्वीं होतं फक्त मक्केला जाया
आरमार उभारलं पश्चिमेस राखाया
भारती जन्म दिला ज्यानं गनिमि काव्याला
भारताचा पहारेकरी मराठा झाला

आग्र्यांत शिवबाचं थडगं बांधणाऱ्याला
थडगं बांधून घ्यावं लागलं शिवबा चरणाला
जो दुःख, दैन्य, दारिद्र्य अंधकाराला
चुटकीत सारितो दूर, नमावे त्याला

(चाल) आजही हवा मज असाच शिवबा माझा
तो समाजवादी महाराष्ट्राचा राजा
तो राजा कसला लोकशाहीचा कलिजा
मुजरा माझा त्या महान् संस्कृति-बुरुजा
भागवीत होता आधीं जनतेच्या गरजा
नफ्यासाठीं धडपडे त्यास म्हणे तूं मर जा
ठावं न्हवता विसावा फक्त ठावं होति प्रजा
सारि हयात घोड्यावर गेली, काया झिजविली
प्रजा सुखी केली, कीर्ति पसरली
अशी फुलवेली, पुनः उगवली नाहि बघा राजे ॥ अहो
कधिं बरें पुनरुपि सह्यगिरी हसणार ?
आनंद त्याचा कधीं उसळुन वर येणार ?
रात्रिच्या अंधाराला सूर्य कधीं चिरणार ?
अरबी दर्याचा चेहरा कधीं खुलणार ?
बांधावर आंब्याचा वृक्ष कधीं डुलणार ?
आंब्याच्या ढोलित कोयाळ कधीं गाणार ?
हर्षानं मयुर कधिं सांगा टाहो फोडणार ?
पोपटांचा थवा कधिं गात पुनः उडणार ?
चिमण्यांचा चिव्‌चिवाट् आगळा कधी होणार ?
झोपडीवर सुखाचं तोरण कधीं दिसणार ?
शाहिराच्या मनींची ओढ, काळजाला फोड—
फुटुन तो गोड गळ्यानं गीत कधीं गाणार ॥ जी ॥
हा समाज-शिवबा बनुन मजपुढें यावा

तो साडेतीन कोटींत समवला जावा
त्यानं शिवबा सरजाचा कित्ता आज गिरवावा
सत्तेचा नांगर जरबेंत त्यानं चालवावा
नफेबाज चोर त्यानं सर्व दूर सारावा
अवघा समाज समृद्ध–सुखी बनवावा
त्या थोर समाज–शिवबाचा पोवाडा गावा
त्याच्या नामस्मरणिं महाराष्ट्र डुंबुनी जावा
त्याचा गात गात पोवाडा खेळ संपावा
ही फक्त अमर अभिलाषा दुजी न्हाई भाषा
एक ही आशा, शाहिराचा गोड हट्ट पुरवावा, जी जी ॥

•

## उद्धमसिंगाचा पोवाडा

नव्हतं झालं पुसट दर्शन मायदेशाला ॥
असा वीर चमकुनी आग्लंभूमिमंदि गेला ॥
जे देशभक्त म्हणवून घेति स्वतःला ॥
सारे पार विसरुनी गेले उद्धमसिंगाला ॥
शाहीर नाही विसरत शूर वीराला
ज्यानि देशासाठीं नरदेह पणा लाविला ॥
जरि उद्धमसिंगाचा मार्ग मान्य नाहिं मला ॥
हेतुबद्दल त्याच्या नाहिं शंका अमर शाहिराला ॥
म्हणून् करतो स्मरण अन् गातो त्याच्या कवनाला ॥
डफ साथीला तुणतुणेवाला-हे रामा रे राघुबा दाऽजी ॥ १ ॥

उद्धमसिंग अज्ञात वीर । पंजाबि पोर । कंवळा सरदार
येवढं हाय् ठाऊक साऱ्या जगतास । क्षणार्धांत बसला त्याला
गळफांस ॥

विजेचा ठाव ठिकाणा कोणास माहित असणार ?
सांगा तुम्हि राजे हो राजे जी राघुबा दाजी ॥ २ ॥

( चाल बदलून )

एकुणीसशे चौदाच्या वेळीं ॥
सरकारनं ठोकलि आरोळी– ॥
साजरी करा दिपवाळी ॥
आम्हि युद्ध संपतांच मुळी ॥
घालुं स्वराज्याचि तूप पोळी ॥
घ्या हातीं बंदुकिचि नळी ॥
करा आम्हां मदत या वेळीं
मग हिंदी जनता सारि भोळी । गेलि धावुन
धैर्य, शौर्यानं युद्ध जिंकून, दावलं त्या वेळीं
हे मर्दा रे राघूबा दाजी ॥ ३ ॥

एकोणिसशें एकोणिस साला
जनतेला आनंद होता झाला
म्हणे विजय युद्धामंदि झाला
स्वातंत्र्य मिळंल आपल्याला
सुख मिळंल आतां समद्याला
अन्न वस्त्र पोरा बाळांला
शेतकरी चैन करणार । मजा करणार । लाडू खाणार
पंचपक्वान्न खाऊं लागणार म्होरच्या काळाला
आशेनं जनतेचा जीव उबवुनी गेला,
हे रामारे ऽ राघुबा दाजी ॥ ४ ॥

(चाल बदलून)

सारे हिंदी लोक आनंद व्यक्त करतांना
साम्राज्य सरकारला धन्यवाद देतांना ॥

स्वातंत्र्य मागणी करूं लागले त्यांना
आठवण करा अन् करा पूर्ण वचनांना
किती लाल युद्धावर गेले मेले थोडि शांति मिळूंद्या त्यांना ॥
कोरकुट्का लाभुद्यां रस्त्यावरति तडूफडून मरति जे त्यांना ॥
वणव्याला विझवाया पाणि घेउनि जावं ॥
पेट्रोल तस पाण्यानं रान पेटावं ॥
स्वातंत्र्य मागाया हिंदी लोक सारा गेला ॥
रौलेट् ॲक्टचा बडगा माथिं बैसला. हे रामा हेऽराघू ॥ ५ ॥

( चाल बदलून )

दाव्णीला रेडा पोसावा ॥ चाऱ्याच्या गंजींत सोडावा ॥
पेंडिचा रतिब लावावा ॥ खाऊं घालून मस्त बनवावा ॥
आशेनं जीव भरून यावा ॥ कुळवाला शेवटीं जुंपावा ॥
माल्काचा रोख ताडून । द्यावं हुंदडून ॥
आतडं काढून । मुडदा पाडावा ।
माल्काच्या रक्तवासानं रेडा बेहोष—
नाचूं लागावा हे रामाऽहे राघू ऽ ॥ ६ ॥

( चाल बदलून )

गाईंना जखडलं होतं साऱ्या दावणीला ॥
चौबाजूनं दरवाजा दुस्मनानि बंद केला ॥
गवताच्या गोठ्यामंदि जीव त्यांचा अडकला ॥
घासलेट पाजिलं त्यांनीं तसल्या गोठ्याला ॥
अग्नीचा भस्मासुर त्याच्या म्हागं लाविला ॥
शंखनाद जोराचा एकसारखा केला ॥
हंबरडा गायींचा त्यांत लोपुनि गेला ॥
म्हणून विष्णुदेव मोहिनी रूप न्हाई झाला ॥
चौकडं भस्मासुर सारखा नाचूं लागला ॥

दिल्लींत कितीतरि लोक उभा मारिला ॥
कलकत्त्यामंदी कत्तलखाना उघडिला ॥
गुजराणवालावर स्वैर बॉम्ब टाकिला ॥
करणीचा कळस अमृतसर मंदी झाला ॥
पहिल्यांदा जालियनवाला बाग उघडिला ॥
कधिं नव्हता ऐकिला असा अत्याचार केला ॥
हे रामाऽ हे राघु ऽ हे जी ॥ ७ ॥

## चौक दुसरा

(चाल बदलून)

एप्रीलच्या तेरा तारखेला । संध्याकाळीं सहा वाजण्याला ।
जालियन्वाला बागेला । लोकांचा जमाव होता झाला ।
वीस हजार स्त्री–पुरुष आला । स्वराज्याची मागणि करण्याला ।
शांततेनं सभा घेण्याला । हें कळलं डायर साय्बाला ।
ओड्वायर हुकूम सोडि त्याला ।
"दीडशेच्या घेऊन फौजेला । निवडक जवान साथीला ।
भरपूर दारूगोळ्याला । घेऊन जा तूं बागेला ।
मनसोक्त करी गोळीबार । हिंदी लोक फार ।
माजले कर ठार । हुकुम घे तुला ॥
स्वातंत्र्य मागते हिंदी जनता, स्वातंत्र्य देइ तूं तिला ॥

जा बाळा रे । गुणिबाळा रे" राघूबा दाजी ॥ ८ ॥
मग फौज कडक घेउन । डायर गेला धावून ।
बागेच्या तोंडि येऊन ॥ चिलखती गाडा ठेवून ॥
चिमण्यांचा थवा पाहून ॥ जसा जाई ससाणा धावून ॥
तसा घुसला आंत वेगानं ॥ निःशस्त्र जनता पाहून ॥
नेभळट गेला हुरळून ॥ सभाबंद हुकुम सोडून ॥

दारांत आडवा होऊन ॥ साहेब गर्जे आकडून ॥
“ सिपाहियों सारे सज्जाव । गोलिको चलाव ।
घोडेको दबाव । रस्ता लोकांचा ठेवा रोखून ।
दस्त्यानं काढा सारे झोडपून” । दया नाहि रामा ।
हे रामारे ऽ राघूबा दाजी ऽ

( चाल बदलून )

उंच उंच भिंति बागेला होत्या लागल्या ।
शेंदाड शिपायांनि वाटा साऱ्या रोखिल्या ।
फट् फट् फट् फट् फायरी झडूं लागल्या ।
टप् टप् टप् टप् टापा उडूं लागल्या ।
बायका पोरामंदी संगिनी नाचूं लागल्या ।
काळपट पांढऱ्या संगिनी लालेलाल झाल्या ।
दाहि दिशा धुरानं काळ्या कुट्ट जाहल्या ।
गारांच्या पावसावाणि गोळ्या वर्षु लागल्या ।
बागेमधून किंकाळ्या कानीं येउं लागल्या ।
रक्ताच्या धारा अन्याय वर्णु लागल्या ।
देवानं कानावर फेटा घेतला बांधुनी ।
म्हणून धावा ऐकाया न्हवतं जगामंदि कुनी ।
क्षणभर पहावे नेत्र थोडे उघडुनी ।
गरम गरम रक्ताचा पाट अंगाखालुनी ।
सुस्कारे हळू हळू येति हजारों कानीं ।
स्वातंत्र्य मिळाले म्हणती मिटल्या डोळ्यांनी ।
निःशस्त्र बायका पोरांचि दशा पाहुनि ।
रडूं लागली धायी धायी । माझी धरति माई ।
गेलि काळवंडुनी । सूर्यानं घेतलं आपलं तोंड झांकून
हे रामा ऽ ऽ हे राघू ऽ ऽ ॥ १० ॥

(चाल बदलून)

एकादी तान्ह्याची आई। होता तिला सई पाना फुटलाई।
रक्ताळलं अंग घेउन उठणार। तरफडत घराकडं निघणार।
कांहिं येळा सरपटाया लागणार। बाळाचं रडणं कानि घुमणार।
आईचं भरतं तिला येणार। तशिच ती पुढं सरकूं लागणार।
सरपटत दाराकडं येणार। पुढं काय सावूलि दृष्टि पडणार।
प्रेतं तुडवीत सावली येणार। बुटाची लाथ शेवटिं बसणार।
माथ्यावर दादा, आईच्या दादा हे रामा ऽऽ हे राघू ऽऽ ॥ ११ ॥

(चाल बदलून)

कांहिं जीव त्यांत तहानेले। पाणि, पाणि, ओरडूं लागले।
पाण्याविना तडफडून मेले। नाहि आले रेडक्रॉसवाले।
सेवा धर्म पार विसरले। जंगल सारे हादरलें।
झाडं पाडं रडूं लागले। रडून रडून काळेकुट झाले।
लोखंड मेण मऊ झाले। दगड बी घामाघुम झाले।
वाघ, सिंह गर्भळित झाले। सर्पांचे वीष उतरले।
लाजेनं रानटी जनावरं मान खालिं घालून वावरूं लागले।
जे मंद मंद चालती श्वास ते सूड सूड बोलले।
हे मर्दा रे राऽघूबा दाजी ॥ ॥ १२ ॥

## चौक तिसरा

(चाल बदलून)

हा सूड शब्द त्या वेळीं ऐकू नाहि आला।
जालियन बागेमध्यें प्रकार काय जाहला।
कळुं दिलं नाहि अक्षर एक जगताला।
पांच म्हैने पंजाबांत मार्शल लॉ ठेविला।
एक एक परकार कायद्याचा त्यानि तिथं केला।

भर उन्हांत चालवित न्हेत पोराबाळांला ।
फटक्यांची शिक्षा चौकांत येई नशिबाला ।
घासावं नाक कायदा बद्‌माषानीं केला ।
लोटांगण घालायाचि सक्ति कोणाला ।
आई भैनिची अब्रू पडलि राजरस्त्याला ।
माजोरी डायर जगापुढं सांगु लागला ।
" नव्हत्या गोळ्या म्हणून झाल्या होत्या झाडून ।
ठेवा बंदुक, हुकूम । नाइलाज म्हणून सोडिला ।
असत्या गोळ्या अजून । सारा पंजाब भाजून ।
नकाशांतून पुसुन । दाविला असता जगताला " ।
बोले कुत्रा रे मूजोर दाजी ॥ १३ ॥

निःशस्त्रावरती गोळि त्यानं झाडली ।
अन् तीच भादुरी सायबाला वाटली ।
धुंदीमंदि सवारी लंडन शहरीं आली ।
चर्चिलची सवारी स्वागताला त्याच्या आली ।
पाठिवरति त्याच्या बघा थाप त्यानें मारिली ।
म्हणे भादरानं भारतात मर्दुमकी गाजविली ।
अन् साम्राज्याची इज्जत जी राखिली ।
लॉर्डांची सभा त्यावरति खूस जाहली ।
तलवार सोन्याची बहाल तिनं त्याला केली ।
भर सभेंत चर्चिलानं मुक्ताफळं उधळली ।
लंडनच्या गरिब जनतेला । परकार काय झाला ।
कळलं नाहि तिला । मर्दुमकि गाजवायाला साहेब कुठं गेलान् ।
कधीं लढा दिला । कळलं नाहि तिला ।
ऐका तुम्ही राजे । राजे जी राघूबा ॥ १४ ॥

## चौक चौथा

उद्धमसिंग अज्ञात वीर । पंजाबी पोर । कवळा सरदार
येवढं हाय ठाऊक साऱ्या जगतास ।
क्षणार्धांत बसला त्याला गळफास ।
विजेचा ठाव ठिकाणा कोणास माहित असणार ?
सांगा तुम्ही राजे हो राजे राघूबा दाजी ॥ १५ ॥

( चाल बदलून )

उद्धमसिंग अवघा होता पंधरा वर्षांचा बाळ
फुलपांखरावाणि नाचायचा खेळायचा काळ
जालियन् बागेमध्यें नाचे आग्यावेताळ
पाहून बंद झाला बाळ राजाचा खेळ
काडतूस पिस्तुलाचा घालि खेळाशी मेळ
भरभक्कम घेतलं पिस्तुल । काडतुस भलं त्यानं जमविलं ।
ऐका तुम्ही राजे हो राजे जी राघूबा दाजी ॥ १६ ॥

[ चाल—धन्य शिवाजी ]

शिकण्यासाठीं स्वारि निघाली ऐका लंडनला ।
एंजिनियर होण्याचा बहाणा होता त्यानं केला ॥ हा जी ए जी.
तीच काडतुसें पिस्तुलही ते घेई साथीला ।
लपवुन घेऊन पठ्ठा शेवटी विलायतीं गेला ॥ हा जी ए जी.
एंजिनियरच्या करि अभ्यासा ध्यास मात्र त्याला ।
काडतुस आणि पिस्तुल पूजा दरेक दिवसाला—॥ हा जी ए जी.
खुद्द मायकेल ओडवायरला दोस्त त्यानं केला ।
असा तसा न्हाई भरल्या दरबारी ठेंचु बेत केला ॥ हा जी ए जी.

( चाल बदलून )

एकवीस वर्षे तो अग्नि शांत भासला ।
शत्रुला वाटलं अग्नि विझुनिया गेला ।

अग्निची राख पन् -हायलि नाहि नांवाला
मग सूड कोठलान् भीति कोठली त्याला ?
परि खुद्द त्याच्या नगराला । चाळिस सालाला । धक्का बैसला ।
कॉक्स्टन हॉलमंदि । लाखो लोकामंदि सूड शब्द उमटला ।
हे मर्दा रे राघोबा दाजी ॥ १७ ॥

## चौक पांचवा

एकोणिसशे चाळिस सालाला । मार्चच्या मध्य महिन्याला ।
त्याच खुनी तेरा तारखेला । लंडन राजधानीला ।
कॉक्स्टन हॉल जागेला । समारंभ होता सुरू झाला ।
पिऊपिऊन आमच्या रक्ताला । साम्राज्यवादि माजला ।
त्या दिवशि मस्तिमंदि आला । बेताल नाचु लागला ।
पाय ठरत न्हवता धरनिला । बेहोष धुंदिमंदि समारंभ चालला ।
हे राघूबा रे रामा रे दाजीरं ॥ १८ ॥

(चाल बदलून)

मायकेल ओडवायर, झेटलंड, लुईडेन
जालियन्वाला बागेचे आरोपी तीन ॥ जी जी जी
बैसले होते खुर्चिला खुर्चि टेकून ॥ जी जी जी
धुंद डोळे इंडियन् रक्त-सुरा प्राशून ॥ जी जी जी
प्रोत्साहन मस्तिला देती ताल देऊन ॥ जी जी जी
इतक्यांत फटाक् फट आवाज कानि येऊन
सैरावैरा धावाया लागे सारा सभाजन ॥ जी जी जी
बदमाष ओड्वायर खाली पडे कोसळून ॥ जी जी जी
अन् पडला डेनचा खुनी हात मोडून ॥ जी जी जी
झेटलंड झटकला आपला प्राण घेऊन ॥ जी जी जी
उडविला ओडवायर । एक्या गोळीवर । गेला हवेवर
चुट्किसरशी उडविला ।

सूड घेउन उद्धमसिंग । मेरू मणी छातीठोक ।
उभा राहिला । हे मर्दा रे रा ऽ घूबा दाजी ॥ १९ ॥

( चाल बदलून )

इतक्यांत संगिनी चम् चम् चम् चमकल्या
त्या शौर्यशील सरदारजीला बिलगल्या
पाहून धीराचा पुतळा त्याहि लाजल्या
जेथल्या तेथं त्या चित्रावाणि थबकल्या
चोरावाणी सरदाराच्या पाठिं चालुं लागल्या
गजा आड गेला सरदार त्याबि लोपल्या
संगिनी बंदुकिच्या गोळ्या गारठून गेल्या
आश्चर्य चौकडं साऱ्या दिशा हादरल्या
म्हणे भरल्या दरबारी कुणी गोळ्या झाडल्या ?
चौकडं सरदाराच्या गोष्टि होउं लागल्या
इंग्लंडच्या मड्मा चरकल्या । उताविळ झाल्या ।
विनवुं लागल्या । एकदां दावा सरदार । मोह अनिवार ।
कोण हा वीर । पाहुं । बोलल्या
तो राणा रे राघूबा दाजी ॥ २० ॥

## चौक सहावा

बेचाळीस दिवस त्यानं अन्नत्याग होता केला ।
शत्रूच्या पाण्याचा घोट नाहिं घेतला ।
पर्वतावाणि उल्हसित दिसे सर्वांला
कोर्टाची पायरि जरि वीर चढूं लागला ।
कोर्ट नाहीं फांशीचा तख्त त्याला भासला ।
धीरोदात्त गतीनं हंसत हंसत वीर आला ।
ब्ल्यू सर्ज रेघाचा सूट त्यानं पेहरला ।

किरमिजी रंगाची टॉय शोभते त्याला ।
हॅट नाहीं काढली तसाच आंत त्यो गेला ।
न्यायाधिशापासुन सर्वांस्नि धस्का बैसला ।
जून म्हैन्यामंदी बरोबर पांच तारखेला ।
इंग्रजी न्यायदानाचा फार्स संपला ।
आंवंढा गिळित् न्यायाधिश सरदारास्नि बोलला ।
तुम्हि सांगा शब्द चार । होऊन होशीयार ।
तुमचि बाजु फार । ऐकायाचि आम्हाला ॥
चूक झाली म्हणा । करा अर्ज दुणा ।
करूं क्षमा पुनः आपणाला ।
शूर सरदारजी राघूबा दाजी ॥ ॥ २१ ॥

गर्जला वीर न्यायासन गेलं हादरून ।
" पुनः काढूं नका असा शब्द होतो अपमान ।
जाणून बुजुन मी मारिलेत सैतान ।
सारा हिंदी नाडला आज ज्यांच्या करणीनं ।
दाविलेत जगाला त्यांतुन कुठं एक दोन ।
साम्राज्यशाहीनं कोटि चिरडिले प्राण ।
स्क्रू तिचा एक ढिला केला माझ्या मशनिनं ।
माझ्या राष्ट्रासाठीं मी केलं कार्य जागुन ।
होवो कांहि शिक्षा मी आनंदानं साहिन " ।
सरदार सहा कागद दावि वाचून ।
त्याच्या मंदी साधासा हिशेब दाविला त्यानं ।
" चाळीस कोटितुन दोन कोटि जनतेनं ।
एक एक ढिला स्क्रू केला एक होऊन ।
अडतीस कोटिला रक्त खत जाऊन ।
वाढेल भारती बाग तुफान वेगानं ।
मरण्यांत मजा कां कुत्र्याच्या मौतीनं ! " ।

झाले नव्हते सारे कागद पुरते वाचून।
तड्फडाट् झाला साहेब गेला तापून।
अन् पुढचि जबानी बंद केली जज्जानं।
ती प्रसिद्ध सुद्धां होऊं दिली न्हाई त्यानं।
तिळपापड झाला न्हाई राहिले भान।
घालावी टोपि सांगावी शिक्षा जज्जानं।
हा नियम सुद्धां जज्ज गेला विसरून।
फांशिच्या पुढचि काई। शिक्षा दिसली न्हाई।
त्याला देया पायीं। म्हणून गोऱ्या जज्जानं।
"फाशी" "फांशी" किंचाळून। मनीं चरफडुन।
उठे खुर्चितुन। फांशी लिहून त्वेषानं।
तुम्हि ऐका हो राघुबा दाजी ॥ २२ ॥

"फांशी" हा शब्द सरदारा कानीं आला।
"झिंदाबाद" "झिंदाबाद" "झिंदाबाद" गर्जला।
कोर्टावर थुंकुन नाचत बाहेर आला।
नाचता, गाता सरदार फांशि चालला।
ऐन उमेदींतला सिंह फांशि चढविला।
फांशिचा दिवस नाही ठावं जगी कोणाला।
दुःखाचा प्रकार त्याच वेळीं भारतांत झाला।
कॉंग्रेसनं रामगढि निषेध सरदाराचा केला।
काई हिंदी लोक इंग्लंड मंदी जमा झाला।
न्हाई गप्प बसवलं गेलं भाऊबंदाला।
त्यांनी बी सरदाराचा निषेध सभेमंदी केला
गजराज एखादा चिखलामंदीं रुतलेला।
काव काव करावं कुनी चौकडून त्याला।
साम्राज्यशाहिनं प्रकार हा पाहिला।
ऐटीनं सांगुं लागली साऱ्या जगताला।

आम्हि उद्धमसिंग हा शब्द पुसुन टाकला।
ज्यानं जालियन बागेचा सूड घेतला।
दाविलं जगाला हिंदी अजून न्हाई मेला।
विसरेल कसा जन दिव्य जालियनवाला?।
विसरेल कसा कुणि शूर उद्धमसिंगाला?।
त्याचा शब्द कानामंदि। श्वास हिर्द्यामंदि।
मूर्ति डोळ्यामंदि दिसते आज समद्याला।
त्याला मुजरा करून। भक्ति गजरा करून।
पवाडा घ्यो मनुन। अर्पितो शाहीर सिंहाला।
हे मर्दा रे राघूबा दाजी॥ ॥२३॥

# महाराष्ट्र झेंड्याचा पोवाडा

फड फड फड फड फडके महाराष्ट्र झेंडा गगनांत
सर्वांग भरलं त्याचं न्हालं उभा रक्तांत
हर हर महादेव हर हर महादेव
हर हर महादेव हर हर महादेव
हर हर महादेव त्याचा शब्द जाई कण्हण्यांत
फड फड नाहीं त्याचि तडफड ध्यारं ध्यानांत
एड्या कोकरावाणि कारं भटकताय रानांत
जर का नाहीं जागं झालात झेंड्याला साथ दिली न्हाई घात।
ठेवलेलाच रामा हे रामा रे राघूबा दाजी॥
परंपरा याचि वैभवशाली अरुणाची लाली जगावर आली
कोण लपवील?
अभिमानास्पद इतिहास। जगीं जन्मास। घालायाला खास।
शिवप्रभु आलं॥ अहो आलं हो॥ १॥

जनतेनं प्राणययज्ञानं त्याला पोसलं
कृष्णावाणी जन्म घेवोनी दीन दुबळ्यास्नि अभयदान दिलं
दोन लाख फौज घेऊन जे मराठ्यांत आलं
सारा महाराष्ट्र जिंकु या हिंमतिनं भलं
त्याचं थडगं याच मराठ्यांत यानं बांधलं
पुरावाच हवा तर शाहिर तुम्हां दावील ।
औरंगाबादेहुन फक्त पंधरा मैल । कंसागत दिल्ली तख्ताला लोळविलं
वचनांचि करुनि खैरात नाहिं फसविलं पुढं होऊन पूर्ण स्वातंत्र्य मिळवुनि दिलं।
आम्हां मराठ्यांचा महाराष्ट्र जगा शिकविलं ।
अजब अमृत जगीं शिंपिलं । राष्ट्र मेलेलं । जिवंत त्यानं केलं
हे मर्दा रे राघुबा दाजी ॥ २ ॥
बंगालच्या समुद्राला हादरा त्याचा बैसला
दर्शनासाठीं तिष्ठतच बसलि होती सिंधुमाई अटकेला
कटकेहून दौडला घोडान् अटकेला गेला
अशी परंपरा ज्याचि थोर । वक्त परि घोर आहे येणार ।
ऐका तुम्हि राजे । अहो राजे जी राघुबा दाजी ॥ ३ ॥
अटकेला झेंडा लागला । होता पाहिला । आनंद होता झाला ।
आम्हा मराठ्यांना दोन बोटं स्वर्ग राहिला
अटकेहून आलेन् गेले थेट रंगमहाला
रंगमहालांत नवी बया भेटलि त्याला
लावणीचा पाहुन शिणगार । रूप तिचं न्यारं । झाला बहाद्दर
पुरा थंडगार । सांगु काय राजे हो राघुबा दाजी ॥ ४ ॥
समरांत लवलवे लकलक बिजलीपरी
तलवारहि नाचे ज्याचि तांडवापरी
कळवात्निघरी नेत्रांच्या कट्यारीवरी
नाचणे समजला ह्यो मर्दुमकी खरी

डबक्यालाच महासागर समजुं लागला
डरॉंव डरॉंव कळवात्निच्या घरीं करूं लागला
जसा आमचा मंत्रि खुर्चिवर जाऊन बैसला
ढेकणागत चिकटलाय खुर्चि सोडवनाय त्याला
महाराष्ट्रावरती प्रसंग भयानक आला
मंत्रिपदाचा राजीनामा मी देतो बोलला
मंत्रिपदाचा मोह त्याला नाहीं आवरतां आला
थापा मारून महाराष्ट्राचा घात त्यानं केला
मशगूल पुरा घरकोंबडा घरामंदि झाला
लावणीनं वाट दिली मागं फंदफितुरीला
इष्काच्या प्याल्यामंदि महाराष्ट्र बुडविला
मंत्रिपदानं वाट दिली आज फंदफितुरीला
थापांच्या प्याल्यामंदीं महाराष्ट्र बुडविला।
गुंग झालि स्वारी रंग् महाली। घुबडानीं संधि साधली
करणिला फळं त्यांच्या आलीं। मर्कट सेना भंवताली
महाराष्ट्र झेंडा ओढायाला आपुला खाली
सज्ज तोफखान्यासह झाली
ही झोंप तुम्हाला काळझोंप ठरणारी
ही थापेबाजि रौरवीं तुम्हा नेणारी
भारताचि गाणिं गाणार। कालपावतर अमर शाहिर ॥
विनवितो तुमा जाहिर। तोच शाहिर। यारं या यारं
मैदानांत राजे हो। राजे जी राघुबा दाजी ॥ ५॥
मेढे कोट रक्ताचा झेंड्याभोंवति उभा करा
रहा जिवंत नाहिंतर लढतां लढतां मरा
ब्रीद मराठ्याचं जर असंल दावाय पुढं सरा
नाहीं तर बांगड्या भरान् खुशाल जा घरा
इथं सक्ति नाहि कोणाला। मर्द एकला। मराठा राहिला।

शत्रूंशी करिल मुकाबला । येंउं द्या भला भला । लाविल वाटेला
होय हो राजे हो राजे जी राघूबा दाजी ॥ ६ ॥

एक एक मराठा गढ किल्ला भासेल
फंद फितूरिच्या मुळालाच सुरुंग ठासेल
सह्याद्रि पुनर्पी खद्‌खदून हांसेल
दरि कपार जागतिल नेत्रिं घालुनी तेल
अन् गनिमि काव्याचा हिसका मग उमगेल
या वेळीं मराठा कोण मागं राहील
खुर्चीचा मोह तो पुरा सोडुन देईल
राखेल झेंड्याला देऊन प्राणाचं मोल
मजबूत एकीचा हात । ठरलेली बात । शत्रूचे दात ॥ घशांत घालणार
अन् आम्ही विजयि होणार । गात जाणार । मंत्र हर हर ।
गर्जा तुम्हीं राजे अहो राजे जी राघूबा दाजी ॥ ७ ॥

## लावणी

कळी उमलली आताच खुलली
नका खुडूं हो तिला राजसा
चरणि गंध वाहिला.
आताच खुलली नयनें इवली
क्षण पाहूं द्या मला राजसा
प्राण रवी आपुला ॥ १ ॥

हिंदोळ्यावर क्षण डोलूं द्या
लपंडाव पळभर खेळूं द्या
थकल्या दमल्या या जीवा मग
हवाच कर आपुला ॥ २ ॥

# प्रणाम

हिंदी–संघ–राज्याच्या जन–आत्म्या तूं घेई प्रणाम
पराधीन जगताच्या दुर्दम दोस्ता घेई प्रणाम
महाराष्ट्र गुजराथ आंध्र कर्नाटक तामिळनाड
तसेच केरळ आसाम् ओरिसा; राजस्थान बिहार
उगवतिचा पंजाब
मावळतीचा वंग
लुकलुकती रत्नें
उधळित नित नव रंग
स्वतंत्र झालीं अधिकच खुललीं दुनिया दिपली
पाहुनि तव बलिदान–घेई घेई प्रणाम ॥ १ ॥

कळिकाळाची मगर मिठी तूं छिन्न भिन्न केली
दीड शतक जो मूर्च्छित मानव जाग त्यास आली
ठोकिल आरोळी
हा प्रातःकाळीं
वृद्ध, तरुण, बाळें
उठतिल यांवेळीं
नव्या यशानें, नव जोमानें, गातिल गाणें
करावया बलिदान–घेई घेई प्रणाम ॥ २ ॥

साम्राज्याला जरि यश आलें चिरावया पंजाब
सिंध, पठाण अलग लावण्या वंग भूमिला आग
भगतसिंग आत्मा
दुभंग होइल कां ?
स्वप्न रवींद्रांचें
विरून जाईल कां ?
टाकुं कीमया, स्वयंनिर्णया, ऐक्य कराया
करूं जिवाचें रान–घेई घेई प्रणाम ॥ ३ ॥

उरल्या सुरल्या साम्राज्यांना देउं मूठमाती
शरण आणूं हे चिनी आक्रमक तृण धरुनी दातीं
मंत्र दिशा दाही
" संपूर्ण लोकशाही "
हिंदि ऐक्य साधूं
हीच पुन्हां ग्वाही
धनिकशाहीला; गुलामगिरीला, जातियतेला
ना थारा ना आराम–घेई घेई प्रणाम ॥ ४ ॥

कोण जिंकु शकणार ? आम्हांला ॲटम ! कोठला बॉंब !
मैदानीं येउं द्या घालुं आम्हीं लोक जुटीचा बांध
तोफा रणगाडे
इथेंहि लढतील
भारत शत्रूंचे
मुडदे पडतील
शस्त्रें घेऊं, अस्त्रें घेऊं, जिंकुनि दावूं
मानव नाहिं गुलाम–घेई घेई प्रणाम ॥ ५ ॥

आणि शेवटीं अणु, परमाणू
जनतेच्या सेवेला आणूं
संघ–संस्कृती नवीच बाणूं
नवजन शक्ती हेंच सुकाणूं
खुलवूं जीवन–बाग
लावुं जुन्याला आग
नव्या जगापुढती
नवा आळवूं राग
स्वतंत्र राहूं, समता ठेवूं, यशास गाऊं
आण घेई जन आम–घेई घेई प्रणाम ॥ ६ ॥

( पान १२ वरून )

जनतेनं पुन्या करण्याऐवजीं हीं भजनं, हीं गीतं जतन करून ठेवलीं व तीं मला या अमरगीत–संग्रहासाठीं आणून दिलीं.

जनतेनं माझ्या गीतांसाठीं दाखविलेला हा जिव्हाळा मीं कसा विसरूं शकेन ? सरकारच्या या काळ्या करणीमुळं मी कांहीं मागचीं चांगलीं गीतं या अमरगीतांत देऊं शकलों नसलों तरी त्याहिपेक्षां चांगलीं गीतं लिहून मीं जनतेला द्यावीं इतकं प्रेम मला जनतेनं दिलं, जिव्हाळा दाखवला. म्हणूनच ही अमरगीतांतील अपूर्णता भरून काढण्याचा माझ्या थोर जनतेपुढं जाहीर निश्चय मी आज करतों आहे.

माझ्यापुढं या गीतांच्या प्रस्तावनेचा प्रश्न होता. माझ्या एका मित्रानें सुचवलें कीं तुम्हीं गाणीं केव्हांपासून व कशीं लिहूं लागलांत हें तुम्हींच प्रस्तावनारूपानें सांगा म्हणजे बरें होईल. मी तसें करणारहि होतो, पण या संग्रहाला महाराष्ट्रांतील थोर मर्मज्ञ पंडित प्रो. न. र. फाटक यांनीं प्रस्तावना देण्याचें कबूल केल्यामुळें तो बेत मी रहित केला. एवढें खरें कीं माझीं गाणीं लिहायची सुरुवात झाली ती १९३० सालच्या राष्ट्रीय चळवळीचे वेळीं होय. अर्थात् त्या वेळेपासून जी कविता मी लिहीत आलों ती माझ्या प्रत्यक्ष जीवनांतून व माझ्या गावरान भाषेंतूनच हें सांगणें नलगे !

या सर्व गाण्यांची जन्मकथा कांहीं वेळां मोठी गंभीर, यातनामय आहे तर कांहीं वेळां वैचित्र्यपूर्णहि आहे.

कलावंत आपल्या कलाकृतींना प्राणाहून प्यार समजतो. त्यांना तो स्वतःच्या रक्ताची किंमत देतो. आपल्या कलेचा नाश आपल्या डोळ्यांनीं तो कधीं पाहात नाहीं. मी मात्र माझ्या गीतांचा नाश सतत पाहात आलों आहे. आजवर अशीं आपलीं गीतं कुणाच्या सांगण्यावरून कुणी किती फाडून टाकलीं हें मला तरी ठाऊक नाहीं. पण कारण, अकारण, परिस्थितीनुरूप नाइलाजानें, तर कधीं खरोखरीच चूक दाखवून दिल्यामुळें अशी माझी किती तरी गाणीं काळाच्या दाढेंत मला टाकावीं लागलीं

आहेत; हें सत्य माझीं "गाणीं जेव्हां बोलायूला लागतील" तेव्हां उमगून येईलच. हा ज्याप्रमाणें माझ्या गाण्यांचा एक कटु इतिहास आहे तशीच त्याची दुसरी बाजू तितकीच उत्साहपूर्ण, स्फूर्तिदायक, उज्ज्वल व वैभवशाली अशी आहे. हें सत्य महाराष्ट्र प्रत्यहीं अनुभवीत आहे. त्याविषयीं निराळें लिहीत नाहीं. मला, तसेंच सर्वांनाच ठाऊक आहे कीं, हीं गाणीं महाराष्ट्राच्या शहरांतून, चाळीचाळींतून, खेड्यांपाड्यांतून, दऱ्याकपारींतून विखुरलीं आहेत. हजारोंच्या ओंठांवर नाचत आहेत. लाखोंच्या कानावर गर्जत जाऊन तिथं त्यांच्या मनावर आपलं मानाचं स्थान कोरून ठेवीत आहेत. तसेंच लाखोंच्या कंठांतून ललकारण्यासाठीं महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून त्यांनीं आपला मोर्चा बांधिला आहे. त्या अनुषंगानें मला माझ्या लोकगीत—गायकांना नम्रतापूर्वक कांहीं सूचना करायच्या आहेत.

आपल्या गाण्यांना शास्त्रीय संगीताचा पाया असलाच पाहिजे असं अट्टाहासानं सांगणाऱ्यांपैकीं मी एक आहे. पण मला हें ठाऊक आहे कीं, माझे लोकगीत–गायक हे तसे धनिक नाहींत. त्यांना अत्यंत अडचणींतून, हलाखींतून जीवन जगावें लागतें. मग ते गाण्याचा इतका सखोल अभ्यास आज कसे करणार ? हें जाणूनहि एवढें मला सांगावेसें वाटतें कीं, आपल्या गाण्यांत सुरेलता आणि तालबद्धता हीं असलींच पाहिजेत.

कलाक्षेत्रांतल्या कांहीं ठेकेदारांना वाटतें कीं कामगार, शेतकऱ्यांना कला कशाशीं खातात हें मुळीं ठाऊकच नाहीं. आग, भूक, क्रांती, उठाव, लढाया एवढ्या शब्दांची खैरात आरडाओरड करून "रेकत राहाणं" हीच आम्हां कामगार शेतकऱ्यांची कला, अशी भोळी समजूत या "महान् प्रज्ञावंतांची" झालेली आहे. ज्यांनीं कधीं ढोलकीचा ताल तसेंच झिलकऱ्याचा लागलेला षड्ज, पंचम ऐकलेला नसतो; ढोलकीवाला अथवा झीलकरी यांतून कुणी जरी बेताल अथवा बेसूरपणा दाखवला तर कलेच्या दृष्टीनं अडाणी समजला जाणारा कामगार, शेतकरी घोंगडी झटकून 'हुईऽऽऽ' करून कार्यक्रम कसा उधळून लावतो हें पाहिलंहि नसतं, अशा

त्या "सर्वगामी प्रज्ञावंतां" विषयीं मला कांहींच लिहायचें नाहीं. पण आपण प्रत्यही पाहात आहोंत कीं, गुंडगिरीच्या, कायद्याच्या दंडुक्यांना झुगारून देऊन तत्त्वज्ञानाचे लोकविरोधी बुरखे फाडून फेकून आपली ही लोककला महाराष्ट्रांत सैराट धांवत निघाली आहे. कानाकोपऱ्यांत तिचे ध्वनी उमटत आहेत. नवनवे लोकगायक, नवनवीं कलापथकं महाराष्ट्रीय जनतेसमोर येत आहेत.

ज्यांनीं आपल्या लोककलेकडं पाहून तुच्छतेनं नाकं मुरडलीं, चंग बांधून विरोध केला, ठेवलेल्या वर्तमानपत्रांद्वारें बदनामी करण्याचा जीव तोडून प्रयत्न केला; त्या झाडून साऱ्या 'महाभागांना' या लोककलेचा आश्रय घ्यावासा वाटूं लागला. आज साऱ्या मेळेवाल्यांनीं, सोशालिस्टांनींच नव्हे तर अगदीं कट्टर कॉंग्रेसवाल्यांनींसुद्धां आपल्या 'सर्वोदयाच्या' गाड्याला या लोककलेला जुंपलें आहे. अर्थात्, झाली ही गोष्ट चांगलीच झाली. कलेंतून जीवनाचं प्रचंड स्वरूप व्यक्त करून; कलेद्वारें जीवनाचं, जीवनकलहाचं विश्वदर्शन घडवून, कलेचीं मूल्येंहि शंभर टक्के जिथल्या तिथें ठेवून तिचं मंगल स्वरूप तसंच तेजाळ ठेवून तिच्या कलामूल्यांना अधिक उजाळा देऊन तिला जनतेसाठीं राबवलं पाहिजे. निदान आज तरी कलेपासून मिळणारा निर्भेळ आनंद लुटण्यासाठीं हें केलं पाहिजे. तसें आज अनेक प्रकारचे विरोध न जुमानतां होत आहे, ही जीवनांतली फार मोठी गोष्ट आहे. कलाक्षेत्रांतली ही वेगवान प्रगतीच आहे.

पण आपण लोककलावंतांनीं जरा अधिक खोलवर जाऊन विचार करायला शिकलें पाहिजे. आपल्याला हेंहि दिसून येतें कीं बऱ्याच वेळां या लोककलावंतांच्या कांहीं विभागांना अपयश पदरीं घ्यावं लागतं; अर्थात हें स्पष्ट आहे कीं, त्यांतलीं कलामूल्यें व जीवनविषयक मूल्यें हीं नीट अभ्यासलीं न गेल्यामुळंच त्यांच्या तुटपुंजेपणामुळंच हें अपयशाचं माप पदरीं पडतं.

जेव्हां सत्ताधाऱ्यांचा राजदंड नव्हे, 'ठेवलेल्या' गुंडांची गुंडगिरी नव्हे, तर समोरची जनताच कार्यक्रम उधळून लावते, नापसंती दर्शविते

मराठी ... ग्रं. ... १४८०८

तेव्हा लोककलावंतांनीं अंतर्मुख झालें पाहिजे; जनतेपासून शिकलें पाहिजे. समोरची जनता हाच कलावंतांचा खरा आरसा, महान् गुरू, हें जर आपण लोककलावंतांनीं सतत ध्यानांत घेतलें नाही, तिच्यापासून शिकलें नाहीं तर सारें आटोपलेंच.

लोककलावंतांनीं जनतेपासून शिकून, तिनें स्वानुभवानें मिळवलेल्या, जतन करून ठेवलेल्या शास्त्रापासून बोध घेऊन कलेचा सर्वांगीण विचार करून कलेचा दर्जा वाढवून आपल्या मानवी संस्कृतीला अधिक उजाळा आणला पाहिजे.

कामगारांना, शेतकऱ्यांना, लोककलावंतांना संस्कृति ठाऊक नाहीं; त्यांच्या कलेंत शास्त्र नाहीं असं म्हणायला आपण काडीइतकाहि आधार देतां कामा नये. कलेंत शास्त्र व जीवन हीं अगदीं हातांत हात घालून गेलीं पाहिजेत. म्हणून माझें लोकगीत–गायकांना नम्र सांगणें आहे कीं, त्यांनीं आपलें स्वरज्ञान व तालज्ञान हें पक्कें बनवलेंच पाहिजे.

कलेला, सौंदर्याला नियम आहेत. ते शेतकरी, कामगार जाणतो, अंमलात आणतो, हें स्वतः कृतीनें दाखवून दिलें पाहिजे. तें अवघड नाहीं.

जातां जातां गीतांतील आशयाविषयींसुद्धां मला लोकगीत–गायकांना एक सूचना करावीशी वाटते. ती ही कीं गाण्यांचा पूर्ण अर्थ पदरांत पडल्याशिवाय गाणें मुळींच म्हणूं नये. गाण्यांत जर अर्थबोध होत नसेल तर सरळसरळ लोकगीतकाराशीं संबंध जोडून अर्थ स्पष्ट करून घ्यावा. चूक असेल तर दाखवून द्यावी व गीतांचा आशय स्वतः नीट समजून घेऊन मगच गाणाऱ्यानें तें गीत अगदीं स्पष्ट उच्चारांत विकृत न करतां सुरांत, तालांत, गावें. फक्त एवढेंच.

२५–३–५१ —अमर शेख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ६५०२५ दि: ...

REFBK-0014804

REFBK-0014804